अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मा.सर्वसाधारण सभेपुढील विषय.

१ मागील दिनांक १३-९-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे

२ दुखवटयाचे प्रस्ताव

३ प्रश्नोत्तरे -

१.मा.श्री.कृ.द.जाधव,नगरसेवक यांचे दि.६-४-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे.

२.मा.श्री.संजय चोपडा ,नगरसेवक यांचे दि.२५-५-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे.

३.मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम,विरोधी पक्ष नेता यांचे दि.२८-७-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे.

४ धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व थोर सेनानी महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेबाबत मा.श्री.शिंदे अनिल माधवराव नगरसेवक यांची यादी.

५ भुषणनगर चौक ते डायमंड बेकरी ते दत्त चौक ,वैष्णवनगर या रस्त्यांस धर्मवीर संभाजी राजे यांचे नाव देणेबाबत.मा.सर्वश्री.कोतकर संदीप भानूदास ,नगरसेवक, लोंढे संजय पांडुरंग,नगरसेवक,कांबळे मंगला राजकुमार, नगरसेविका,राहिंज कमल बापु,नगरसेविका,कोतकर सुनिल रामदास, नगरसेवक, गव्हाळे विजय नाना, नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

६ बंगाल चौकी ते मार्केट यार्ड चौक पर्यंतच्या रस्त्यांला अमर शहीद थोर संत कंवरराम साहेब यांचे नाव देणेबाबत.मा.श्री.घुले अविनाश हरिभाऊ यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

७ गंज बाजारातील नवा मराठा ते मोहन ट्रंक डेपो पर्यंतच्या रस्त्यांस ''कै.धर्मवीर जगदिश भोसले मार्ग '' असे नाव देणेबाबत मा.श्री.मैड सतिष बबनराव नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

८ श्रीमत तृप्ती राकेश चव्हाण ,हिस अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबतचा ऑफीस रिपोर्ट.

९ श्री.उध्दव गोविंद म्हसे यांना गार्डन सुप.या रिक्त पदावर नेमणूक करणेबाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयास्तव.

१० सिव्हील ड्राप्समन या पदावर नेमणुक मिळणें बाबत श्री.सुरेश कोंडीबा इथापे यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

११ अहमदनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणां मार्फत राबविणे कामी मा.शासनाचे पत्रा प्रमाणे लोक -वर्गणीची रक्कम भरणे बाबततसेच कर्जाची रक्कम उभारणीस्तव मान्यता देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

१२ सावेडी स.नं.२१३ / २, २०६ / १ ब / १ अ, २०६ / १ ब / २ / १ मधील खुली जागा वनस्पती उद्यान व आरोग्य प्रकल्प विकसित करणेंसाठी मिळणें बाबत डॉ.राजा ठाकुर,आयुर्वेद व्यासपीठ,शाखा नगर यांचा दिनांक १५-२-०५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

१३ महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधिन करणे , श्रेणीवाढ व नियंत्रण ) अध्यादेश २००१नुसार गुंठेवारी प्रकरणे सादर करणेंस मुदतवाढ देणे बाबत मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता, यांची दि.२६-७-२००५ ची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

१४ अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध आरोग्य केंद्रामध्ये होमिओपॅथिक बाहयरुग्ण

विभागासाठी जागा मिळणें बाबत मा.प्राचार्य अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल,सावेडी रोड,अहमदनगर यांचा दिनांक २३-८-२००५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

१५ अहमदनगर शहरातील आयात होणां-या भाजीपाला व दुधावरील जकातीबाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता यांची दिनांक २०-१०-२००५ रोजीची यादी.

१६ मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

**कृपया तारीख व वेळ मिळावी.**

( एन.जी.चत्तर )
नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ ( अ ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : २८-१०-२००५

श्री./ श्रीमती........................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ८-११-२००५ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : विषय पत्रिका व टिपणी.

नगरसचिव,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. ८-११-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्व साधारण सभेपुढील विषय पत्रिका.

| | |
|---|---|
| १ | मागील दिनांक १३-९-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| ३ | प्रश्नोत्तरे -<br>१.मा.श्री.कृ.द.जाधव,नगरसेवक यांचे दि.६-४-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे.<br>२.मा.श्री.संजय चोपडा ,नगरसेवक यांचे दि.२५-५-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे.<br>३.मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम,विरोधी पक्ष नेता यांचे दि.२८-७-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे. |
| ४ | धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व थोर सेनानी महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेबाबत मा.श्री.शिंदे अनिल माधवराव नगरसेवक यांची यादी. |
| ५ | भुषणनगर चौक ते डायमंड बेकरी ते दत्त चौक ,वैष्णवनगर या रस्त्यांस धर्मवीर संभाजी राजे यांचे नाव देणेबाबत.मा.सर्वश्री.कोतकर संदीप भानूदास ,नगरसेवक, लोंढे संजय पांडुरंग,नगरसेवक,कांबळे मंगला राजकुमार, नगरसेविका,राहिंज कमल बापु,नगरसेविका,कोतकर सुनिल रामदास, नगरसेवक, गव्हाळे विजय नाना, नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | बंगाल चौकी ते मार्केट यार्ड चौक पर्यंतच्या रस्त्यांला अमर शहीद थोर संत कंवरराम साहेब यांचे नाव देणेबाबत.मा.श्री.घुले अविनाश हरिभाऊ यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ७ | गंज बाजारातील नवा मराठा ते मोहन ट्रंक डेपो पर्यंतच्या रस्त्यांस "कै.धर्मवीर जगदिश भोसले मार्ग " असे नाव देणेबाबत मा.श्री.मैड सतिष बबनराव नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ८ | श्रीमत तृप्ती राकेश चव्हाण ,हिस अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबतचा ऑफीस रिपोर्ट. |
| ९ | श्री.उध्दव गोविंद म्हसे यांना गार्डन सुप.या रिक्त पदावर नेमणूक करणेबाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयास्तव. |
| १० | सिव्हील ड्राप्समन या पदावर नेमणुक मिळणें बाबत श्री.सुरेश कोंडीबा इथापे यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | अहमदनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणां मार्फत राबविणे कामी मा.शासनाचे पत्रा प्रमाणे लोक - वर्गणीची रक्कम भरणे बाबततसेच कर्जाची रक्कम उभारणीस्तव मान्यता देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२ | सावेडी स.नं.२१३ / २, २०६ / १ ब / १ अ, २०६ / १ ब / २ / १ मधील खुली जागा वनस्पती उद्यान व आरोग्य प्रकल्प विकसित करणेंसाठी मिळणें बाबत डॉ.राजा ठाकुर,आयुर्वेद व्यासपीठ,शाखा नगर यांचा दिनांक १५-२-०५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १३ | महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधिन करणे , श्रेणीवाढ व नियंत्रण ) अध्यादेश २००१नुसार गुंठेवारी प्रकरणे सादर करणेंस मुदतवाढ देणे बाबत मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता, यांची दि.२६-७-२००५ ची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध आरोग्य केंद्रामध्ये होमिओपॅथिक बाहयरुग्ण |

| | |
|---|---|
| | विभागासाठी जागा मिळणें बाबत मा.प्राचार्य अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल,सावेडी रोड,अहमदनगर यांचा दिनांक २३-८-२००५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| १५ | अहमदनगर शहरातील आयात होणां-या भाजीपाला व दुधावरील जकात माफ करणे बाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता व श्री.राठोड राजेंद्र रामनारायण ,शिवसेना गटनेते यांची दिनांक २०-१०-२००५ रोजीची यादी . |
| १६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : २८-१०-२००५.
अहमदनगर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : १ दि. ८-११-२००५.

प्रस्तावाचा विषय - मागील दिनांक १३-९-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे

प्रस्तावाचा मजकूर - मागील दिनांक १३-९-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविले.

चर्चा :-

१) मा.श्री.सुरेश शेळके - मागील कार्यवृत्त मंजूर करणेबाबत सुचना केली.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - मागील वेळी एकच विषय जकातीबाबतचा घेण्यात आलेला होता. त्याबाबतचा ठराव वाचून दाखवावा. सदरचा ठराव वाचून दाखविण्यात आला. मा.श्री.जाधव यांनी सांगितले की, याबाबत आम्ही ब-याच सुचना मांडलेल्या होत्या. व त्यावेळीही एस्कॉर्ट दर वाढविणेबाबत सांगितले होते. आमच्या सुचना त्यावेळी ऐकल्या असत्या तर आजची ही वेळ आली नसती. त्यावेळी आम्ही एस्कॉर्ट दर ५०/१०० करणेबाबत सुचविलेले होते.

--*--

ठराव : मागील दिनांक १३-९-२००५ रोजी झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. ८-११-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्व साधारण सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | मागील दिनांक १३-९-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे | नियमाप्रमाणे आहे.इतिवृत्त कायम करणेंस हरकत नाही. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव | टिप्पणी नाही |
| ३ | प्रश्नोत्तरे -<br>१.मा.श्री.कृ.द.जाधव,नगरसेवक यांचे दि.६-४-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे.<br>२.मा.श्री.संजय चोपडा ,नगरसेवक यांचे दि.२५-५-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे.<br>३.मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम,विरोधी पक्ष नेता यांचे दि.२८-७-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे. | मा.श्री.कृ.द.जाधव,नगरसेवक,मा.श्री.संजय चोपडा,नगरसेवक व मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम, विरोधी पक्ष नेता यांच्या प्रश्नांची उत्तरे. |
| ४ | धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व थोर सेनानी महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेबाबत मा.श्री.शिंदे अनिल माधवराव नगरसेवक यांची यादी. | मा.सभेने निर्णय घेणेस्तव |
| ५ | भुषणनगर चौक ते डायमंड बेकरी ते दत्त चौक ,वैष्णवनगर या रस्त्यांस धर्मवीर संभाजी राजे यांचे नाव देणेबाबत.मा.सर्वश्री.कोतकर संदीप भानूदास ,नगरसेवक, लोंढे संजय पांडुरंग,नगरसेवक,कांबळे मंगला राजकुमार, नगरसेविका,राहिंज कमल बापु,नगरसेविका,कोतकर सुनिल रामदास, नगरसेवक, गव्हाळे विजय नाना, नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | मा.सभेने निर्णय घेणेस्तव |
| ६ | बंगाल चौकी ते मार्केट यार्ड चौक पर्यंतच्या रस्त्यांला अमर शहीद थोर संत कंवरराम साहेब यांचे नाव देणेबाबत.मा.श्री.घुले अविनाश हरिभाऊ यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | मा.सभेने निर्णय घेणेस्तव |
| ७ | गंज बाजारातील नवा मराठा ते मोहन ट्रंक डेपो पर्यंतच्या रस्त्यांस "कै.धर्मवीर जगदिश भोसले मार्ग " असे नाव देणेबाबत मा.श्री.मैड सतिष बबनराव नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | मा.सभेने निर्णय घेणेस्तव |
| ८ | श्रीमत तृप्ती राकेश चव्हाण ,हिस अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबतचा ऑफीस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टा नुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ९ | श्री.उध्दव गोविंद म्हसे यांना गार्डन सुप.या रिक्त पदावर नेमणूक करणेबाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयास्तव. | ऑफिस रिपोर्टा नुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| १० | सिव्हील ड्राप्समन या पदावर नेमणुक मिळणें बाबत श्री.सुरेश कोंडीबा इथापे यांचा अर्ज व त्यावरील | ऑफिस रिपोर्टा नुसार मंजुरीस शिफारस आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ऑफिस रिपोर्ट. | |
| ११ | अहमदनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणां मार्फत राबविणे कामी मा.शासनाचे पत्रा प्रमाणे लोक -वर्गणीची रक्कम भरणे बाबत तसेच कर्जाची रक्कम उभारणीस्तव मान्यता देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टा नुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| १२ | सावेडी स.नं.२१३ / २, २०६ / १ ब / १ अ, २०६ / १ ब / २ / १ मधील खुली जागा वनस्पती उद्यान व आरोग्य प्रकल्प विकसित करणेंसाठी मिळणें बाबत डॉ.राजा ठाकुर,आयुर्वेद व्यासपीठ,शाखा नगर यांचा दिनांक १५-२-०५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. | ऑफिस रिपोर्टा नुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| १३ | महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधिन करणे , श्रेणीवाढ व नियंत्रण ) अध्यादेश २००१नुसार गुंठेवारी प्रकरणे सादर करणेंस मुदतवाढ देणे बाबत मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता, यांची दि.२६-७-२००५ ची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. | मा.सभेने निर्णय घेणे योग्य. |
| १४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध आरोग्य केंद्रामध्ये होमिओपॅथिक बाहयरुग्ण विभागासाठी जागा मिळणें बाबत मा.प्राचार्य अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल,सावेडी रोड,अहमदनगर यांचा दिनांक २३-८-२००५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| १५ | अहमदनगर शहरातील आयात होणां-या भाजीपाला व दुधावरील जकात माफ करणे बाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता व श्री.राठोड राजेंद्र रामनारायण ,शिवसेना गटनेते यांची दिनांक २०-१०-२००५ रोजीची यादी . | टिप्पणी नाही |
| १६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही |

दिनांक :२८-१०-२००५.
अहमदनगर

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : ८-११-२००५.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दुखवटयाचा प्रस्ताव .

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर :

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | मगनलाल बोरा,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| २ | मनाजी भुजबळ, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ३ | रमेश रासकर , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ४ | निवृत्त फौजदार भिंगारदिवे , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ५ | परमेश्वरी बाई राजाणी , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ६ | अहिल्याबाई बगाडे , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७ | सौ.राधिका पटवा, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ८ | कमलाबाई जैन यांचे संथारा व्रतात, दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ९ | लावणी सम्राज्ञी रोशन सातारकर, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १० | सुरजमलजी सोनग्रा , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ११ | गोकुळदास चंगेडिया, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १२ | लक्ष्मण साळुंखे , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १३ | दत्तात्रय रासने, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १४ | जानकीबाइ ऋषी , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १५ | अंबादास सैंदर, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १६ | माणिकबाई चोपडा, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १७ | संजय सिद्दम, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १८ | शालिनी तांबोळी, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १९ | शंकरराव गोडबोले, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| २० | चिंतामणी विप्रदास, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| २१ | वसंत ननावरे, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| २२ | डॉ.दादी केरावला,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २३ | विठ्ठल (नाना) लांडगे,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २४ | नागनाथ जठार,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २५ | दत्तात्रय रासने,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २६ | श्रीमती.इंदिरा भगवान जोशी,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २७ | रावतमल साखला,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २८ | देविकाबाई भाटे,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २९ | बंडोपंत गोसावी,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३० | रतिलाल गांधी,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३१ | एस.एम.कांबळे, यांचे दुःखद निधनानिमित्त दुःखवटयाचा प्रस्ताव. |
| ३२ | समाजभूषण नामदेवराव राजगुरु, यांचे दुःखद निधनानिमित्त दुःखवटयाचा प्रस्ताव. |
| ३३ | मोहनलालजी राका, यांचे दुःखद निधनानिमित्त दुःखवटयाचा प्रस्ताव. |
| ३४ | नर्मदाबाई फुलसौंदर, यांचे दुःखद निधनानिमित्त दुःखवटयाचा प्रस्ताव. |

| -- २ -- | |
|---|---|
| ३५ | पानकंवरबाई कटारिया, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३६ | महेश सावंत, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३७ | कौशल्या काळे, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३८ | कृष्णाजी बावधाने, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३९ | राजम्मा कोटा, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४० | शशिकांत पालवे, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४१ | राहुल धुप्पड, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४२ | खा.प्रकाशबापू पाटील, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४३ | दुर्गाबाई मुथा , यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४४ | रमेश धनेश्वर, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४५ | बाळकृष्ण दिघे, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४६ | लक्ष्मणराव काळे, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |

दुखवटयाचे प्रस्तावबाबत चर्चा.

दुखवटयाचे प्रस्ताव मांडले गेले असताना त्यामध्ये १) अमृता प्रितम २) गोविंदराव पिचड ३) लक्ष्मणराव काळे याचे निधनाबद्दल दुखवटयाचे प्रस्ताव मंजूर करावेत अशी सुचना करण्यात आली.

दुखवटयाचे प्रस्तावावर चर्चा चालु असताना १) मा.श्री.अशोक कानडे यांनी महापालिकेच्या जलतरण तलावामध्ये अपघाती मृत्यु झालेल्या क्षिरसागर याच्या कुटुंबियाला रु.१ लाखाची मदत देणेबाबत सुचविले होते. परंतु याबाबत गांभिर्याने विचारात न घेता त्याला कोणतीही आर्थिक मदत देण्यात आलेली नाही. याबाबत कोणताही राजकीय मतभेद न करता क्षिरसागर यांच्या कुटुंबीयांना रु.१ लाखाची मदत दयावी, अशी विनंती केली. व मदत देणे हीच श्रध्दांजली ठरेल, असे सांगितले. याबाबत कृपया खुलासा करावा असे सुचविले. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला. त्यावर मा.श्री.कानडे यांनी सांगितले, इतर संस्थांना बरीच मदत केली जाते. तरी याबाबत मदत करण्यास हरकत नाही.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - यांनी सुचविले की, जलतरण तलावामध्ये अपघात झाल्यानंतर गुन्हा नोंद केला होता. त्याबाबत ठेकेदाराकडून कोणतीही मदत दिली गेली नाही. केस काढून घेणेबाबत दबाव टाकण्यात आला.

३) मा.महापौर - जलतरण तलाव ठेकेदार यांना ज्या अटी व शर्तीवर दिलेला आहे त्या अटीशर्ती पाहून ठेकेदाराकडून मदत दयावी असे सुचविले. महापालिकेने ठराव मंजूर केला तरी महापालिकेतर्फे त्याला मदत मिळणार आहे काय अशी शंका व्यक्त केली. तथापी महापौर निधीतून मदत देण्यास माझी हरकत नाही.

४) मा.श्री.जोशी व मा.श्री.कावरे यांनी रु.१ लाखाची मदत महानगरपालिकेतर्फे दयावी असे सुचविले. मा.श्री.जाधव यांनी महापौर निधीतून मदत देणेबाबत सुचविले.

५) मा.श्री.गिरवले - यांनी सुचविले की, याबाबत घडलेली घटना ही दुर्देवी आहे. कुटुंबियांना मदत मिळणे आवश्यक आहे. तथापी महापालिकेच्या रस्त्यात खडडयात पडून अपघात झाले किंवा मोकाट जनावरांनी धडक देउन्न काही दुर्देवी घटना घडल्या. व त्याबाबत मदत दिली जाईल किंवा काय. अशाबाबतच्या मदत देण्याबाबत चुकीचा पायंडा पाडू नका असे सुचविले. व याबाबत जास्तीत जास्त मदत कशी देता येईल याची मा.आयुक्त साहेब यांनी पाहणी करावी.

यावर मा.आयुक्त यांनी मुख्य लेखा परिक्षक श्री.गोरे यांनी खुलासा करावा, असे सुचविले.

त्यावर श्री.गोरे यांनी अशाप्रकारची मदत देणेची तरतूद अंदाजपत्रकात केलेली नाही असे सांगितले. व अंदाजपत्रकामध्ये रिॲप्रोप्रेशन केल्यानंतर मदत देता येईल असे सांगितले.

मा.श्री.गंधे यांनी सुचविले की, चुकीचा पायंडा पडत असेल तर प्रत्येक सदस्याने रु.१ हजार + इतर ३० हजार अशी मदत देण्यास हरकत नाही.

मा.आयुक्त यांनी याबाबत तत्वत: सहमती दर्शविली. व याबाबत कशा प्रकारे मदत देता येईल याची पाहणी करावी, असे सुचविले.

शेवटी याबाबत सानुग्रह अनुदान देणेबाबत मंजुरी देणेत आली.

--*--

ठराव : सदर विषयावर साधक बाधक चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की,मयुर क्षिरसागर याचा जलतरण तलावामध्ये अपघाती मृत्यू झाल्यामुळे त्यांचे कुटुंबीयास रुपये १ लाखाचे अर्थसहाय्य (सानुग्रह अनुदान ) देणेबाबत कार्यवाही करणेचे अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांना देणेत येत आहेत.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.अशोक कानडे,
अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : ८-११-२००५.

प्रस्तावाचा विषय : प्रश्नोत्तरे.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मा.श्री.कृ.द.जाधव,नगरसेवक,अहमदनगर महानगरपालिका यांच्या दिनांक ६-४-२००५ च्या पत्रातील प्रश्नोत्तरे.

| अ.नं. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिकेच्या विकास कामांची देयके अदा करणें आलेल्या भ्रष्टाचाराबाबत प्रश्न उत्तराचे तासात उत्तर मिळणें बाबत.<br>उपरोक्त विषयाबाबत यादी देण्यांत येते की,मा.कक्ष अधिकारी सुनिल कोठेकर,नगरविकास विभाग यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या विकास कामांची देयके अदा करणेंत आलेल्या भ्रष्टाचारा बाबत क्र.आमपा १०२००४ / प्र.क्र.३६० / ०४ नवि - २४ नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई हे परिपत्रक काढलेले आहे. | उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या विकास कामांची देयके अदा करणेंत आलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून अहवाल शासनास सादर करण्यांत आलेला आहे. |

२) मा.श्री.संजय चोपडा,नगरसेवक,अहमदनगर महानगरपालिका यांच्या दिनांक २५-५-२००५ च्या पत्रातील प्रश्नोत्तरे

श्री.धनेश मोहनलाल चाणोदिया, रा.नगर, यांचे मिळकत गट नं. २४२/१ क्षेत्र ४८ आर नगर मनमाड रोड, सावेडी ,अहमदनगर यांचे मालकीचे जागेची माहिती मिळणे बाबत.

| अ.नं. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | सदर मिळकती पैकी महापालिकेने किती क्षेत्र रिंग रोड करीता संपादित केले होते ? | अहमदनगर शहर मंजूर विकास अहमदनगर शहर मंजुर विकास योजनेतील २४.४ मी.रूंद रिंग रस्त्याखालील सावेडी स.नं.२४२ / १ मधील ०.९ आर (९०० चौ.मी.) क्षेत्र संपादित करण्यांचे आयोजित करण्यांत आले होते. तथापि सदर जमिनीचे मालक श्री.धनेश चाणोदिया यांनी सदर जागेचे खरेदी खत करून देणे नाकारल्यामुळे प्रस्तुत क्षेत्र खरेदी घेता आले नाही. |
| २ | सदरहू संपादित मिळकतीचा मोबदला बाजारभावाप्रमाणे ठरला किंवा कसे ? | सदर संपादित करावयाच्या मिळकतीचा मोबदला मा.सहाय्यक संचालक,नगर रचना,अहमदनगर यांनी निश्चीत केलेल्या मुल्यांकनानुसार ठरला आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | ठरला असल्यास तो किती ठरविला गेला ? | मा.सहाय्यक संचालक,नगर रचना,अहमदनगर यांनी सदर संपादित करावयाच्या जागेचे मुल्य रू.१२५ /- प्रति चौ.मि.म्हणजेच एकुण रू.१,१२,५०० /- (एक लाख बारा हजार पाचशे फक्त ) इतके निश्चीत केले आहे. |
| ४ | सदर मिळकतीच्या मोबदल्यात त्यांना मोबदला (पैशामध्ये ) अदा करण्यांत आला किंवा कसे ? | सदर संपादित करावयाच्या जागेचा मोबदला जमिन मालकांना अद्याप अदा करण्यांत आलेला नाही. |
| ५ | आर्थिक मोबदला अदा केला नसल्यास का करण्यांत आला नाही ? | जमिन मालकांना देय असलेली मोबदला रक्कम मान्य नसल्यामुळे त्यांनी जमिनीचे खरेदी खत करून देणे नाकारले असून महानगरपालिकेच्या विरूध्द रे.मु.नं. ५१० / ९८ दाखल केले असून त्याचा निकाल मनपाच्या विरूध्द लागल्यामुळे मनपाने मा.उच्च्च न्यायालयाचे खंडपिठ,औरंगाबाद येथे सेकंड अपिल नं. ६५९४ / २००४ दाखल केले आहे. सबब सदरची बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे मोबदला रक्कम देण्यांत आलेली नाही. |
| ६ | मिळकतीच्या मालकांने आपणांस आर्थिक मोबदला मिळणें करीता विनंती केली होती का ? केली असल्यास केंव्हा केली ? | जमिन मालकांनी त्यांना सदर जागेचा मोबदला दर रू. १२५ /- प्रति चौ.मि.मान्य असून खरेदीखत करून देण्यांस तयार असलेबाबत दिनांक १-४-९७ रोजी इकडेस पत्र दिले होते. परंतू नंतर दि.४-९-९७ रोजी ॲड.प्रमोद मेहेर यांचेमार्फत नोटीस देवून रू.१२५ /- दरा ऐवजी रू.१४०० /- प्रति चौ.मी.दराने मोबदला मिळणें बाबत नोटीस दिलेली आहे. |
| ७ | यापुढे (आजपासुन ) किती दिवसात त्यांना तो मोबदला अदा करण्यांत येईल. | सदरची बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे न्यायालयाच्या निर्णयानंतर मोबदला अदा करणें बाबत निर्णय घेण्यांत येईल. |

२) मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता,अहमदनगर महानगरपालिका यांच्या दिनांक २८-७-२००५ च्या पत्रातील प्रश्नोत्तरे

"भिस्तबाग "खालील मंजूर ले-आउटची माहिती मिळणे बाबत .

१. भिस्तबाग स.नं. २/१अ /२/२,२/४अ आणि २/४ब.
२. भिस्तबाग स.नं. २/१अ /२ब२,२/४अ आणि २/४ब.
३. भिस्तबाग स.नं. २/१अ /२/२अ /४अ आणि २/४ब १,२/४ब२

| अ.नं. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | सदर रेखांकनांस मनपाची अंतिम मंजुरी दिली आहे का ? मंजुरी देतांना किती विकासभार भरलेला आहे त्या प्रत्येकाची रक्कम, पावती नंबर,दिनांक | सदर रेखांकनास अंतिम स्वरूपाची मंजूरी दिलेली असून विकासभार रू. ३,३९,२१९/- पा.नं.०४७३८६ दि. ९-४-२००३ अन्वये वसूल केलेला आहे. |
| २ | सदर रेखांकनाच्या अंतर्गत सुधारणा रक्कम (बेटरमन चार्जेस ) भरलेली आहे. का ? व किती ? असल्यास त्याची रक्कम,पावती | नाही.(अंतर्गत सुधारणा खर्चाचे रक्कमेपेक्षा रेखांकनातील रस्त्याची मोबदला रक्कम जास्त आहे.) त्यामुळे या परिघक्षेत्र नकाशातील |

| | | |
|---|---|---|
| | नंबर,दिनांक | रस्त्याच्या भुसंपादन रकमेचे समायोजन करण्यांत आले आहे. |
| ३ | या रेखांकनातील काही रस्त्यांची नागरिकांच्या / जनतेच्या सोयी साठी भूसंपादन करणे (मनपाची आर्थिक परिस्थिती वाईट / हालाखीची असतांना ) गरजेचे होते का ? | सदर रस्ता मा.जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेल्या परिघक्षेत्र नकाशातील रस्त्यांपैकी आहे. त्यामुळे या रस्त्याची गरज भविष्यात निर्माण होणांर आहे. |
| ४ | या रेखांकनातील जे रस्ते आपण (मनापाने) भूसंपादन केले ते केले नसते तर नागरिकांची गैरसोय झाली असती का ? | परिघ क्षेत्राचे नकाशे शहराचे एकुण नियोजन व भविष्यातील वाहतुक व परिवहन विचारात घेवून केले जातात. त्यामुळे हा रस्ता नियोजनात दर्शविला असल्यामुळे नागरिकांच्या दृष्टीने भविष्यात उत्पयुक्त ठरणांर आहे. |

--*--

चर्चा.

मा.श्री.कृ.द.जाधव यांच्या प्रश्नांची उत्त्तरे देण्यात आली. त्याबाबत त्यांनी सांगितले की, मला दिलेल्या अशा उत्त्तराची अपेक्षा नव्हती.

याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, सदरच्या तक्रारीबाबत शासनाकडे प्राथमिक अहवाल पाठविणेत आलेला आहे. व शासनाने त्याबाबत सविस्तर चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत.

मा.श्री.दीप चव्हाण यांनी सदर चर्चेत भाग घेतला.

मा.श्री.संजय चोपडा यांच्या प्रश्नांची उत्त्तरे ते उत्पस्थित नसल्याने वाचून दाखविली. चर्चा नाही.

मा.श्री.बहिरनाथ वाकळे यांच्या प्रश्नांची उत्त्तरे वाचून दाखविण्यात आली. त्यावर मा.श्री.वाकळे यांनी चर्चा करताना सांगितले की, वास्तववादी उत्त्तरे देण्यात आलेली नाही. यामध्ये खुप मोठा घोटाळा आहे. महानगरपालिकेचे २५ ते ४० लाखाचे नुकसान झालेले आहे. रेखांकनाला व रस्त्याला मंजूरी देताना रक्कम भरली जाते काय? ले आउय्ट मधील जागा भुसंपादन केलेल्या नाहीत. याबाबत गंभीर विचार करुन चौकशी करावी.

मा.श्री.कानडे - यांनी रेखांकनाला व रस्त्याला मंजुरी देताना रक्कम भरली जाते काय? यापूर्वी नगररचना विभागाकडील बरीच प्रकरणे निदर्शनास आणली. जवळजवळ ४४ लाख रु. बिल्डरच्या घशात घातलेले आहेत.

यावर श्री.धोंगडे, नगररचनाकार यांनी ले आउय्ट मंजुरीबाबत खुलासा केला. सर्व्हे नं.२ याबाबत मंजुरीच्यावेळी श्री.बनकर,नगररचनाकार हे कार्यरत होते. त्यावेळी त्यांनी तपासणी केली आहे.

मा.श्री.वाकळे यांनी सांगितले की, ले आउय्टमध्ये खरेदी देत असताना भुसंपादन कशासाठी केलेले आहे. याबाबत मा.श्री.कानडे यांनी सांगितले रस्त्याकरता डेव्हलपमेंट प्लॅन संपादन करणेबाबत कुठली गरज नसताना ले आउय्ट भुसंपादन दाखविले आहे. व त्याबाबत ले आउय्टधारकाला रु.२२ लाख ५१ हजार दिले आहेत, असे सांगितले.

याबाबत मा.आयुक्त साहेब यांनी वस्तुस्थिती विशद करावी व नंतर चर्चा करावी असे सांगितले. यावर श्री.धोंगडे यांनी खुलासा केला दि.१०-४-२००३ रोजी ले आउय्ट मंजूर केला आहे. त्यावेळी नगरपालिका असताना त्यावर शासन परिपत्रकानुसार कार्यवाही झालेली आहे.

मा.महापौर यांनी सांगितले की, सदर गंभीर विषय असल्याने याबाबत मा.आयुक्त यांनी चौकशी करावी.

सभागृहामध्ये गोंधळ नगरसेवक मा.श्री.जोशी, मा.श्री.पवार व मा.श्री.वाकळे यांचे चर्चेच्या वेळी निर्माण झाला.

मा.आयुक्त यांनी उत्पायुक्त श्री.देशमुख यांचे अधिकारात चौकशी करुन याबाबतचा अहवाल दयावा, असे आदेश दिले.

मा.श्री.कानडे यांनी सांगितले की भुसंपादनाबाबत जनरल बोर्डापुढे विषय आलेला नव्हता. त्याबाबत फौजदारी केस करावी, असे सुचविले. यावर मा.महापौर यांनी चौकशी अधिकारी नेमणेबाबत सुचविले. त्यावर मा.आयुक्त यांनी, २ महिन्यात चौकशी करुन याबाबतचा अहवाल उत्पायुक्त श्री.देशमुख यांनी सादर करावा.

**--*--**

ठराव : प्रश्नांची उत्तरे वाचुन दाखविणेंत आली.

सही /-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : ८-११-२००५.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व थोर सेनानी महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेबाबत मा.श्री.शिंदे अनिल माधवराव नगरसेवक यांची यादी.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मा.श्री.कैलास गिरवले,नगरसेवक व मा.श्री.अनिल शिंदे,नगरसेवक यांनी दिनांक ९-५-०५ रोजी यादी देवुन त्यात असे नमुद केले की, आपल्या ऐतिहासिक नगरी मध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व थोर सेनानी महाराणा प्रताप यांचा पुतळा असावा अशी नगर मधील अनेक नागरिकांची अनेक दिवसांपासुन इच्छा आहे. तरी वरील थोर पुरूषांचा पुतळा बसविणे व त्या संदर्भातील विषय मंजुर करणे साठी मनपाच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक असुन त्या करीता मनपाच्या येणां-या सर्वसाधारण सभेमध्ये वरील विषय घेउत्र्न नगरकरांची इच्छा आपण पुर्ण करावी अशी आपणांस नम्र विनंती.

अशाबाबतची मा.श्री.कैलास गिरवले,नगरसेवक व मा.श्री.अनिल शिंदे,नगरसेवक यांची यादी पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविली.

--*--

चर्चा.

१) मा.श्री.कैलास गिरवले - विषय मंजूर.

२) मा.श्री.मिलींद गंधे - महाराणा प्रताप यांचा पुतळा मिस्कीन मळा येथे व छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा महालक्ष्मी उत्र्दयान येथे बसवावा.

३) मा.श्री.सुरेश शेळके - छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा नेप्ती गेट चौकामध्ये बसविणेबाबत सन १९९७ सालीच ठराव झालेला असून त्या ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही. व पुतळयाबाबत श्री.परदेशी, पुणे यांना वर्कऑर्डर देण्यात आलेली होती. त्यावर काय कार्यवाही मनपाने केलेली आहे हे सांगितले पाहिजे.

त्यावर मा.महापौर यांनी याबाबत सिटी इंजिनिअर यांनी खुलासा करावा, असे सांगितले.

मा.उत्र्पायुक्त यांनी चर्चेमध्ये सांगितले की, छत्रपती संभाजी महाराज यांचे पुतळयाबाबत वर्कऑर्डर दिलेली होती. व त्यावर कलासंचालनालयाकडून मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव गेलेला होता. त्यावर अदयाप कार्यवाही झालेली नाही.

चर्चा चालु असताना मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, वेळोवेळी रस्त्याचे, चौकाचे नांवे देणेबाबतची मंजुरी दिली जाते. पण याबाबत बोर्ड लावले जात नाहीत. यावर मा.महापौर यांनी श्री.मगर, सि,इंजिनिअर यांना खुलासा करणेची सुचना केली. त्यावर श्री.मगर यांनी खुलासा केला की निरनिराळया ठिकाणी नांवे बोर्डावर लावणेबाबत बोर्ड तयार करणेसाठी कोटेशन मागविलेले आहे. व त्याची कार्यवाही चालु आहे.

त्यावर मा.महापौर यांनी सांगितले, मा.श्री.गंधे यांनी बोर्डबाबत चांगले नमुने दिले आहेत. त्याप्रमाणे बोर्ड लावण्यात येतील.

४) मा.श्री.कैलास गिरवले - यांनी सुचविले की, सर्जेपूरा चौकामध्ये माजी नगराध्यक्ष छबु पहिलवान यांचे नांवाचे ज्याप्रमाणे चांगला बोर्ड लावलेला आहे त्याप्रकारचे बोर्ड लावावेत.

५) मा.श्री.अशोक कानडे - सभागृहामध्ये वेगवेगळे बोर्ड लावणेबाबत मंजुरी मिळते. पंरतु पुढील कार्यवाही होत नाही.

६) मा.श्री.मिलींद गंधे - यांनी सांगितले की, कै.मल्हारराव गिरमे पथ या नांवाचा बोर्ड ही गायब झालेला आहे.

७) मा.श्री.अनंत जोशी - कार्यालयाकडून जे प्रस्ताव सादर केले जातात ते योग्य माहिती न घेता व कार्यवाही न करताच अर्धवट प्रस्ताव सादर केले जातात.

८) मा.श्री.कैलास गिरवले - दिलेली नांवे राजपत्रात प्रसिध्द करावीत.

९) मा.श्री.कृ.द.जाधव - यांनी सांगितले की, मी २ नांवे देणेबाबत सुचविले होते. १) बेपारी मोहल्ला २) मल्हारराव गिरमे पाटील मार्ग. तसेच पूर्वी गंजबाजारामध्ये आचार्य चंदनमल गुंदेचा यांचे नांव दिलेले आहे. याबाबतचा विषय क्र.७ घेण्यात आलेला दिसतो. ते तपासून पहावे.

१०) मा.महापौर - निरनिराळया ठिकाणी नांवे देणेबाबत जे बोर्ड लावावयाचे आहेत त्याबाबत बोर्डाचे ३,४ नमुने तयार करुन ते जनरल बोर्डापुढे दाखवून नंतर कार्यवाही करावी.

कॉम्प्युटर खरेदीबाबत वर्तमानपत्रात आलेल्या बातम्याबाबत चर्चा उत्पस्थित झाली असता मा.आयुक्त साहेब यांनी सांगितले की, वर्तमानपत्रात आलेल्या बातम्याबाबत चौकशी करुन पुढील सभेत रिपोर्ट ठेवण्यात येईल. यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, वर्तमानत्रातील आलेल्या सर्वच बातम्यांबाबत चौकशी करावी.

मा.श्री.नामदेव पवार यांनी दै.सार्वमतमध्ये आलेल्या चांगल्या बातम्यांबददल दै.सार्वमतचा अभिनंदनाचा ठराव संमत करणेबाबत सुचना केली. त्यास मा.श्री.गंधे यांनी अनुमोदन देउत्न ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--*--

**ठराव :** सदर विषयावर साधक बाधक चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, सन १९९७ साली नेप्ती नाका चौक आयलंड या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणे बाबत ठराव पारीत झाला. त्यानुसार निविदा मागवून कार्यारंभ आदेश देण्यांत आले. परंतु पुढील कार्यवाही झालेली दिसुन येत नसलेने सदर प्रकरणाची पुढील योग्य ती कार्यवाही त्वरीत सुरू करावी. मा.शासनाच्या नियमाप्रमाणे पुतळया बाबतच्या सर्व कार्यवाही करणेत यावी व नेप्ती नाका चौक या ठिकाणी पुतळा बसविणे तसेच संभाजी महाराजांचे चौकास नांव देण्यांबाबत पारित झालेल्या ठरावाप्रमाणे बोर्ड लावण्यांबाबत देखील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी. थोर सेनानी महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा तयार करणे बाबत सविस्तर प्रस्ताव तयार करणेंत यावा. सदर पुतळयासाठी सर्व आवश्यक बाबी तपासून महालक्ष्मी उद्यान किंवा मिस्कीन मळा परिसर या ठिकाणची योग्य जागा निवडण्यांत यावी.उचित कार्यवाही करण्यांत यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री.सुरेश शेळके.

अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : ८-११-२००५.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : भुषणनगर चौक ते डायमंड बेकरी ते दत्त चौक ,वैष्णवनगर या रस्त्यांस धर्मवीर संभाजी राजे यांचे नाव देणेबाबत.मा.सर्वश्री.कोतकर संदीप भानूदास ,नगरसेवक, लोंढे संजय पांडुरंग,नगरसेवक,कांबळे मंगला राजकुमार, नगरसेविका,राहिंज कमल बापु, नगरसेविका, कोतकर सुनिल रामदास, नगरसेवक, गव्हाळे विजय नाना, नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ चे नगरसेवक मा.श्री.कोतकर संदिप भानुदास यांनी दिनांक ३-५-२००५ रोजी वरील रस्त्यांस नांव देणें बाबत यादी दिलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने यापुर्वी वरील रस्त्यास कोणतेही नांव दिलेले नाही. त्यामुळे सदरच्या रस्त्यास धर्मवीर संभाजी राजे यांचे नांव देण्यांस हरकत नाही.

वरील रस्त्यास नांव देणेंसाठी सदरचा प्रस्तव महानगरपालिका सर्व साधारण सभेपुढे ठेवणेंस व रस्त्यास नांव देण्यांचा प्रस्ताव मंजुरीस्तव महानगरपालिकेचे नगरसचिव यांचेकडे पाठविण्यांस मंजुरी मिळणेंस आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उत्पायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार आदेशार्थ सादर.

अशाबाबतची मा.सर्वश्री.कोतकर संदीप भानूदास ,नगरसेवक, लोंढे संजय पांडुरंग, नगरसेवक, कांबळे मंगला राजकुमार, नगरसेविका,राहिंज कमल बापु, नगरसेविका, कोतकर सुनिल रामदास, नगरसेवक, गव्हाळे विजय नाना, नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा : सदर बाबतीत एकत्रीत चर्चा होवून सर्वानुमते नांवे देणेबाबत मंजुरी देण्यात आली.

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर. रस्ते चौक यांना नामकरणांचे फलक लावणे बाबत यापुर्वीच्या ठरावानुसार ज्या कार्यवाही अपुर्ण असतील त्या सर्वच कार्यवाही प्राधान्याने व लवकरात लवकर पुर्ण करणेंत यावी. तसेच स्वतंत्ररित्या अभियंता यांचेवर हि जबाबदारी निश्चित करावी. मल्हारराव गिरमे पाटील मार्ग यांचे बोर्डा बाबत देखील उचित कार्यवाही करणेत यावी. तसेच सदरची नामकरणाची नांवे राजपत्रात प्रसिध्द करणेंत यावी. ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक : मा.श्री.मिलिंद गंधे. अनुमोदक : मा.श्री.कैलास गिरवले.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : ८-११-२००५.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : बंगाल चौकी ते मार्केट यार्ड चौक पर्यंतच्या रस्त्यांला अमर शहीद थोर संत कंवरराम साहेब यांचे नाव देणेबाबत.मा.श्री.घुले अविनाश हरिभाऊ यांची यादी .

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अमर शहीद थोर संत कंवरराम साहेब या थोर महात्म्यांचे जिवीत कार्य नगरवासियांच्या स्मृतीत चिरकाळ रहावे यासाठी बंगाल चौकी चौकाचे सुशोभिकरण करण्यांत यावे व बंगाल चौकी ते मार्केट यार्ड चौक पर्यंतच्या रोडला त्यांचे नांव देण्यांत यावे असा अर्ज दिनांक २२-३-०५ रोजी मा.नगरसेवक श्री.अविनाश हरिभाउ घुले यांनी दिला आहे.

सदरचे रजिष्टर पाहता सदर रस्त्याला नांव दिल्याची नोंद आढळून येत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूचि " ड " प्रकरण ११ (२) अ नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देण्यांचा अधिकार मा.आयुक्तांना असल्यांने सदरचे प्रकरण सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यांविषयी आदेशार्थ सादर.

अशाबाबतची मा.नगरसेवक श्री.अविनाश घुले यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा : सदर बाबतीत एकत्रीत चर्चा होवून सर्वानुमते नांवे देणेबाबत मंजुरी देण्यात आली.

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर. सर्वच नामफलक लावणे बाबत सत्वर कार्यवाही करणेंत यावी.
ठराव सर्वानुमते मंजूर. सुचक : मा.श्री.कैलास गिरवले. अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :७ दिनांक : ८-११-२००५.

---

प्रस्तावाचा विषय : गंजबाजारातील नवा मराठा ते मोहन ट्रंक डेपो पर्यंतच्या रस्त्यास " कै. धर्मवीर जगदीश भोसले मार्ग "असे नामकरण करणें बाबत मा.श्री.मैड सतिष बबनराव नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर शहरातील प्रभाग क्र.१५ मधील गंजबाजारातील नवा मराठा ते मोहन ट्रंक डेपो पर्यंतच्या रस्त्यास " कै. धर्मवीर जगदीश भोसले मार्ग " असे नामकरण करणें बाबत नगरसेवक श्री. सतिष बबन मैड यांनी यादीद्वारे कळविले आहे. तसेच सदर विषय सर्व साधारण सभेच्या विषय पत्रिकेवर घेण्यांस प्राधान्य द्यावे असे नमुद केले आहे.

सदरील रस्त्यास यापुर्वी नांव देण्यांत आलेले नाही. सबब वरील रस्त्यास नांव देणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

अशा बाबतची मा.श्री.मैड सतिष बबनराव नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा : सदर बाबतीत एकत्रीत चर्चा होवून सर्वानुमते नांवे देणेबाबत मंजुरी देण्यात आली.

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर. सर्वच नामफलक लावणे बाबत सत्वर कार्यवाही करणेंत यावी.
ठराव सर्वानुमते मंजूर. सुचक : मा.श्री.कैलास गिरवले. अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दिनांक : ८-११-२००५.

---

प्रस्तावाचा विषय : श्रीमती तृप्ती राकेश चव्हाण ,हिस अनुंकपा तत्वावर नोकरी मिळणेबाबतचा ऑफीस रिपोर्ट.मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : उत्प्ररोक्त विषयाबाबत सादर करण्यांत येते की, श्रीमती. तृप्ती राकेश चव्हाण यांनी मयत कमर्चारी कै.राकेश ईश्वर चव्हाण, यांच्या जागी अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळावी म्हणुन विनंती केली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेची वर्ग-३ लिपिक पदाची अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणे बाबतची सेवा जेष्ठता पाहता श्रीमती. तृप्ती राकेश चव्हाण, यांचा अनु.क्रं.२ असा आहे. अनु.क्र.१ वर असलेले श्री.संतोष बाळासाहेब वारनौक हे मयत कमर्चारी कै.उत्मेश बाळासाहेब वारनौक यांचे थोरले बंधु असून ते शासन निर्णया प्रमाणे पात्र नातेवाईक नसल्यामुळे त्यांना इकडील जा.नं.९८४ दिनांक २/७/०५ ने अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणे बाबतचा अर्ज निकाली काढणेंत येत आहे. असे कळविण्यांत आले आहे. (सोबत सेवा जेष्ठता यादी)

कै.राकेश ईश्वर चव्हाण हे अहमदनगर महानगरपालिकेत कायम आस्थापना सुचीवर (१४६७ पैकी) ड्रायव्हर म्हणून कार्यरत होते. ते दिनांक १३/१२/२००३ रोजी सेवेत असतांना मयत झालेले आहे. त्यामुळे त्यांची पत्नी श्रीमती. तृप्ती राकेश चव्हाण, यांनी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणे बाबत दिनांक १२/१/२००४ रोजी अर्ज केलेला आहे.

शासन सामान्य प्रशासन विभाग, मुंबई, यांचे कडील परिपत्रक क्र.अकंपा/१०९३/२३३५/ प्र.क्रं.९०/९३/आठ दिनांक २६/१०/१९९४ अन्वये शासन सेवेत असतांना दिवंगत झालेल्या/ बेपत्ता झालेल्या/ वैद्यकीय कारणास्तव सेवा निवृत्त केलेल्या कर्मचा-यांच्या एका वारसास अनुकंपा कारणास्तव नोकरीवर घेता येते. त्यासाठी खालील बाबीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | आवश्यक बाबी | अर्जदाराने पुर्तता केलेल्या बाबी. |
|---|---|---|
| १ | अनुकंपा तत्वावर संबंधित शासकीय कमर्चा-यांची पत्नी/ मुलगा किंवा अविवाहीत मुलगी या नियमानुसार नेमणूकीस पात्र नातेवाईक आहेत. | श्रीमती.तृप्ती राकेश चव्हाण हया दिवंगत कर्मचारी यांच्या पत्नी असुन ते अनुकंपा तत्वावर नोकरीस पात्र नातेवाईक आहे. |
| २ | कर्मचारी दिवंगत झालेचे दिनांकापासुन ५ वर्षाचे आत अर्ज करावयास पाहिजे. | कै.राकेश ईश्वर चव्हाण हे दिनांक १३/१२/०३ रोजी मयत झाले असून अजर्दाराने दिनांक १२/१/२००४ रोजी मुदतीत अर्ज केला आहे. (पा.नं.१) |
| ३ | विहित प्रपत्रातील अर्ज संबंधित आस्थापना अधि. यांचे पडताळणीसह संपुर्ण भरणे आवश्यक आहे. | आस्थापना प्रमुख महानगरपालिका अहमदनगर यांनी शिफारस केली आहे. (पान नं.४३) |
| ४ | वारस प्रमाणपत्र हजर करावयास पाहिजे | तहसिलदार, अहमदनगर यांचेकडील दिनांक ३१/१/०४ रोजीचे प्रमाणपत्र (पान नं.१९) |
| ५ | शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र पाहिजे | शाळा सोडल्याचे दाखले वरुन इ.१२ वी पास (पान नं.१५) |

| | | |
|---|---|---|
| ६ | सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी केले बाबत | अर्जदार यांनी सेवा योजन कायार्लयांत नांव नोंदविलेले नाही. (पान नं.३९) |
| ७ | इतर वारसांचे ना-हरकत प्रमाणपत्र | कुटुंबातील इतर वारस हे अज्ञान असल्याने श्रीमती.तृप्ती राकेश चव्हाण, यांना अनुकंपा तत्वावर नोकरी देणे बाबत संमती पत्रसादर केलेले नाही. (पान नं.३) |
| ८ | दिवंगत कर्मचारी यांचे कुटुंबियांस गटविमा योजना इ.बाबी पासून मिळालेली ठोक रक्कम. | शासन निर्णय दिनांक २६/१०/९४ नुसार अनुकंपा तत्वावर नोकरी कामी शासनाने ठोक रक्कमेची मर्यादा व मासिक उत्त्पन्नाची अट काढून टाकलेली आहे. |
| ९ | कुटुंबातील कोणी शासकीय / निमशासकीय | कुटुंबातील कोणीही शासकीय / निमशासकीय जि.प.सेवेत नसल्या बाबत प्रतिापत्र करुन दिले आहे. (पान नं.३) |

सध्या अहमदनगर महानगरपालिकेत असि.वॉरंट क्लार्क व वसुली लिपीक ही दोन कायम आस्थापना सुचीवरील (१४६७ पैकी) लिपीक संवर्गातील पदे रिक्त आहेत.

श्रीमती. तृप्ती राकेश चव्हाण, यांनी लिपीक या पदावर नोकरी मिळावी म्हणुन अर्ज केला असून त्यांची सविस्तर माहिती खालील प्रमाणे.

| अ.नं. | उत्मेदवारांचे नांव | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | पदाचे नांव | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती. तृप्ती राकेश चव्हाण | १२ वी पास | २४/४/७८ | वसुली लिपीक | ३०५०-४५९० |

तरी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २६-१०-९४ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ५३(१) नुसार अनुकंपा तत्वावर अहमदनगर महानगरपालिकेत कायम आस्थापना सुचीवरील (१४६७ पैकी) वसूली लिपीक या पदावर वेतनश्रेणी रुपये ३०५०-७५-३९५०-८०-४५९० या मध्ये मुळवेतन ३०५०/- अधिक महानगरपालिका नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नेमणूक करण्यांस आदेश होणेस विनंती.

यावर मा.उत्पायुक्त सामान्य यांचा अभिप्राय की, अहवालानुसार तृप्ती चव्हाण यांना नियुक्तीसाठी शिफारस आहे. मात्र नियुक्तीपुर्वी महासभेची मंजूरी आवश्यक आहे.

यावर मा.आयुक्त यांचा अभिप्राय की, टंकलेखन व इतर विहित अटी-शर्ती चे अधिन अनुकंपा तत्वाबाबत प्रस्तावित नियुक्तीशी सहमत.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उत्पायुक्त सामान्य व मा.आयुक्त सो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

<u>चर्चा :</u> मा.श्री.सुळ यांनी प्रस्तावास मंजुरी दिली व त्यास मा.श्री.कैलास गिरवले यांनी अनुमोदन दिले.

--*--

ठराव : प्रस्तावित नेमणुकीस मंजुरी देण्यांत येत आहे. भविष्यात अनुकंपा तत्वावरील वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणां-या वारसांना प्रशासकिय पातळीवर छाननी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देण्यांसही मंजुरी देण्यांत येत आहे. यासाठी होणां-या वेळोवेळीच्या खर्चासही मंजुरी प्रदान करण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.सुरेश शेळके अनुमोदक : मा.श्री.मनेष साठे,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :९ दिनांक : ८-११-२००५.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : श्री.उध्दव गोविंद म्हसे यांना गार्डन सुप.या रिक्त पदावर नेमणुक करणें बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : श्री.उध्दव गोविंद म्हसे यांनी अर्ज देवुन विनंती केली की,मी मा.स्थायी समिती ठराव नं. ६ (३) नुसार आस्थापना जा.नं. ६५४० दिनांक ८-१०-१९९२ पासुन अहमदनगर नगरपालिकेमध्ये उद्यान विभागामध्ये गार्डन सुपरिटेन्डेंट या पदावर काम करत होतो. सदरचे पद हे रिक्त पद आहे. तसचे ओपन साठी आहे. तसेच मा.स्था.स.ठराव नंबर ३४ दिनांक ३-१२-८९ नुसार आस्थापना जा.नं. ६६२६ दिनांक ७-११-०१ ने दिनांक ९-१२-०१ पर्यंत सलग सेवेत होतो.

तसेच मला औद्योगिक न्यायालय,अहमदनगर केस नंबर (युएलपी) ९५/९४ चे अंतिम आदेशान्वये दिनांक १८ फेब्रुवारी १९९९ अन्वये सेवेत कायम करणेंचे आदेश केलेले आहेत. तसेच सदरील पदासाठी आवश्यक असणांरी शैक्षणिक पात्रता मी पुर्ण केलेली आहे. तरी माझे अर्जाचा मला सेवेत घेणेचे दृष्टीने विचार व्हावा हि विनंती.

सदर बाबत सविस्तर रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिकेतील आस्थापना सुचीवर गार्डन सुपरिटेन्डेट हे पद मंजुर असुन सदर पदाची शैक्षणिक पात्रता बी.एस.सी.ॲग्री किंवा बी.ए.जी.अशी आहे. तसेच पाचव्या वेतन आयोगानुसार सदर पदाची वेतनश्रेणी ५५००-१७५-९००० अशी आहे. सदरचे पद एकच असल्यामुळे ते एकाकी असून खुल्या प्रवर्गासाठी आहे. सदरचे पद रिक्त आहे.

श्री.उध्दव गोविंद म्हसे यांना ऑक्टोंबर १९९२ पासुन उद्यान विभागाकडे गार्डन सुप.या पदावर तात्पुरत्या स्वरूपात वेळोवेळी तांत्रिक सेवाखंड देवुन दरमहा आदेश देण्यांत आलेले आहेत. दरम्यानचे काळात श्री.म्हसे यांनी मा.औद्योगिक न्यायालय,अहमदनगर येथे तक्रार (युएलपी) ९५/१९९४ ही केस दाखल करून मला सेवेमध्ये कायम करावे अशी मागणी केली. सदर केस मध्ये मा.औद्योगिक न्यायालय यांनी अंतरिम आदेश देवुन तक्रारदार यांची सेवा पुढील आदेश होईपर्यंत खंडी करू नये असा आदेश दिला. त्याप्रमाणे संबंधितांस वेळोवेळी तांत्रिक खंड देवुन दरमहा गार्डन सुप.म्हणुन आदेश देण्यांत येत होते.

सदर केसचा अंतिम निर्णय मा.औद्योगिक न्यायालय,अहमदनगर यांनी केस नं. (युएलपी) १४१६/१९९१ व इतर या केस बरोबर एकत्रीतपणे दि.१७-२-९९ रोजी निर्णय देवुन संबंधितांस कायम सेवेत सामावुन घेण्यांचे आदेश दिले. सदर निर्णयाविरूध्द तत्कालीन नगरपरिषदे तर्फे मुंबई उच्च्च न्यायालयाचे औरंगाबाद येथील खंडपीठासमोर अपील / रिटपिटीशन नं.३३३३ / १९९९ दाखल केलेले असून सदरचे अपील / रिटपिटीशन अद्यापर्यंत मा.न्यायालयासमोर प्रलंबित आहे. मा.उच्च्च न्यायालयात अपील / रिटपिटीशन दाखल केल्यानंतर संबंधितांस शासन निर्णयानुसार दरमहा आदेश देण्यांत आलेले नाहीत.

तसेच श्री.उध्दव गोविंद म्हसे यांचेप्रमाणे तत्कालीन नगरपरिषदेमध्ये मंथली आदेशावर लॅब टेक्नीशियन या पदावर काम करणांरे श्री.दरवडे यांनी नोकरीत सामावून घेणेबाबत अर्ज केला असता, श्री.दरवडे यांना रिक्त पदावर सामावुन घेणे बाबतचा प्रस्ताव मा.सचिव,नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडे इकडील आस्थापना जा.नं.१३३९ दिनांक १७-१०-२००३ अन्वये मान्यतेस सादर करणेंत आला होता.

सदर प्रस्तावा बाबत नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ए.एच.सी.१००३ / २२८३ / प्र.क्र./ २९४ / ०३ / न - २४ दिनांक १९-४-०४ अन्वये आपण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये उचित कार्यवाही करावी असे कळविले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये नेमणुकी बाबत तरतुद आहे. ५३ (१) अन्वये ज्याचे वेतन भत्ते वगळुन रू.४०० /- किंवा त्यापेक्षा अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्यांचा अधिकार महानगरपालिकेत विहीत असेल.

परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन रू.४०० /- किंवा अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या आस्थाई नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की,आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करतांना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे. आणि उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर महापालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणांर नाही.

कलम ५३ (२) अन्वये (१) मध्ये तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त मुख्य लेखापरिक्षक व नगरसचिव यांचे नियंत्रणाखाली व तात्पुरते अगर कायम नेमणुक करणेंचा अधिकार स्थायी समितीच्या मान्यता मिळविल्याच्या अधिन यथास्थिती मुख्य लेखा परिक्षक व नगरसचिव यांचेकडे विहीत असेल मात्र कोणत्याही विशिष्ट प्रकरणांत किंवा वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्यांची आवश्यकता असणांर नाही.

५३ (३) सदर कलमान्वये अधिनियमांत तरतुद केली नसेल तर त्या व्यतिरिक्त कायम वा तात्पुरते कर्मचारी यांची नेमणुक करण्यांचा अधिकार आयुक्तांकडे राहील. परंतुकाप्रमाणे आयुक्तास ६ महिने तात्पुरती नेमणुक करता येईल.

नेमणुक करण्यांची रित :

कलम ५४ १) आयुक्त किंवा त्याने पदनिर्देशित केलेला कोणताही अन्य अधिकारी,म.न.पा.मुख्य लेखापरिक्षक ,संबंधीत विभाग प्रमुख व आयुक्तांने नामनिर्देशित केलेला फक्त एक अन्य अधिकारी यांची एक निवड समिती असेल.

२) आधीच न.पा.सेवेत असलेल्या व्यक्तीमधुन नेमणुक करावयाचे योजीले असेल त्या व्यतिरिक्त किंवा नेमणुक तात्पुरत्या स्वरूपाची असुन ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी नसेल तर कर्मचारी निवड समितीने नियमाद्वारे विहित केलेल्या रितीने कलम ५३ पोट कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नेमणुकी व्यतिरिक्त व महापालिका शासनाच्या पुर्व मंजुरीने आदेशाद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील अशा नेमणुकी व्यतिरिक्त नगरपालिका सेवेतील अन्य सर्व नेमणुकांसाठी उत्मेदवाराची निवड केली पाहिजे.

३) नगरपालिका सेवेत नेमणुका करण्यांस सक्षम असलेल्या प्रत्येक प्राधिकारी कर्मचारी निवड समितीने दिलेल्या निदेशानुसार अशा रितीने निवडलेल्या उत्मेदवाराच्या नेमणुका करील.

या कलमाच्या तरतुदीच्या अधिन कोणत्याही नगरपालिका अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणुक नियमात स्पष्टपणे तरतुद केलेली असेल त्या व्यतिरिक्त अशा नियमाद्वारे विहित केलेल्या रितीने करण्यांत येईल.

वरील प्रमाणे कर्मचा-यांच्या नेमणुकी बाबत तरतुदी आहेत.श्री.म्हसे हे तत्कालीन नगरपरिषदेत गार्डन सुपरिटेंन्डेंट या पदावर हंगामी स्वरूपात काम करीत होते. सदरचे पद आस्थापना सुचिवर मंजुर असुन ते सध्या रिक्त आहे. व सदर पदाची वेतनश्रेणी ५५०० - १७५ - ९००० अशी आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये महानगरपालिकेमध्ये मा.प्रशासक ठराव नं. २३१ दिनांक २६-१२-२००३ अन्वये संवैधानिक पदे वगळुन इतर पदावर नेमणुकीसाठी १.मा.आयुक्त २.मा.उत्प्रायुक्त ३. मुख्य लेखा परिक्षक ४.संबंधित खात्याचा प्रमुख यांची समिती गठित करण्यांत आलेली आहे.

श्री.म्हसे यांचे प्रकरण पाहता त्यांना गार्डन सुपरिटेंन्डेट या कायम पदावर तात्पुरत्या स्वरूपात पुन्हा - पुन्हा नियुक्त्या दिलेल्या असुन औद्योगिक न्यायालयाने त्यांना कायम सेवेत घेण्यांचे निर्देश दिलेले आहे. तत्कालीन नगरपरिषदेने मा.संचालक,नगरपरिषद प्रशासन ,मुंबई यांचे निर्देशानुसार मा.उत्च्च न्यायालयात अपिल केले असले तरी न्यायालयाने औद्योगिक न्यायालयाचे आदेशास स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे औद्योगिक न्यायालयाचे आदेश कायम असुन तत्कालीन नगरपरिषद व आजची महानगरपालिका यांनी

आज अखेर या आदेशाचे अनुपालन करणे शक्य न झाल्याचे दिसुन येते.

यापुर्वी श्री.गोरक्षनाथ दरवडे ,लॅब टेक्नि.यांचे बाबत मा.शासनाचे मार्गदर्शन मागविले असता त्यांनी महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये उत्रचित कार्यवाही करावी असे कळविले आहे. श्री.म्हसे यांना तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक देणे झाल्यास कलम ५३ (१) नुसार म.न.पा.च्या मंजुरीने नेमणुक देणे आवश्यक आहे. त्यांना तात्पुरती सहा महिन्यांपर्यंत नेमणुक देवुन पुढे पुन्हा विचारार्थ म.न.पा.कडे पाठविण्यांची कार्यवाही करावयाची असल्यास नेमणुकीपुर्वी स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे.

श्री.म्हसे यांना नेमणुक देणे झाल्यास मा.न्यायालयातील प्रलंबित अपीलाचे निर्णयास अधिन राहुन द्यावी लागेल.

यावर मा.उत्रायुक्त (सा)यांचा अभिप्राय की, प्रस्तावित कामगार हे सन १९९२ पासुन खंडित मुदतीत नोकरीस असुन त्यांना नोकरीत कायम करणे बाबत मा.औद्योगिक न्यायालयाने निर्णय दिले असुन त्याबाबत मा.उत्र्च्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. तथापि औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयास स्थगिती नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ व ५४ मध्ये कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यांची पध्दत नमुद केलेली आहे. कलम ५३ (१) प्रमाणे हंगामी नेमणुक करण्यांचा अधिकार मा.आयुक्त यांचेकडे विहित असुन तसे महासभेला कळविले आवश्यक आहे.

कलम ५३ (२) प्रमाणे निवड समिती मार्फत निवड करणे आवश्यक आहे.

कलम ५४ (१) प्रमाणे निवड समिती करून त्यांचे मार्फत निवड करणे आवश्यक आहे. परंतु पोट कलम (२) प्रमाणे आधीच न.पा.सेवेत असलेल्या व्यक्तींमधुन नेमणुक करावयाची असल्यास निवड समितीने तसे ठरविल्यास नेमणुक करता येईल अशी तरतुद आहे.

श्री.म्हसे हे कृषी पदविधारक (बी.एस.सी.ॲग्री) असुन १९९२ पासुन हंगामी नोकरीत होते. आस्थापना सुचीवर गार्डन सुपरिटेंन्डेट हे पद मंजुर असुन त्याची शैक्षणिक पात्रता बी.एस.सी.ॲग्री किंवा बीएजे अशी आहें. व मंजुर वेतनश्रेणी रू.५५०० -९००० अशी आहे. सदर पात्रता श्री.म्हसे धारण करीत आहेत.

श्री.दरवडे यांच्या नेमणुकी बाबत मा.नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठवला असता त्यांनी दिनांक १९-४-०४ च्या पत्रान्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये उत्रचित कार्यवाही करावी असे कळविले आहे.

श्री.म्हसे यांनी यापुर्वीच मा.कामगार न्यायालयात अवमान याचिका दाखल केलेली आहे. तसेच शासनाकडुन दरवडे बाबतचे आलेले उत्त्तर विचारात घेता श्री.म्हसे यांना कलम ५१ (१) नुसार मनपाच्या मंजुरीने नेमणुक देणे आवश्यक आहे. त्यांना तात्पुरती सहा महिन्यांसाठी नेमणुक देवुन पुढे पुन्हा विचारार्थ मनपा कडे पाठविण्यांची कार्यवाही करावयाची असल्यास नेमणुकीपुर्वी स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. सदरचे पद एकाकी असुन आरक्षण नाही.

श्री.म्हसे यांनी दाखल केलेले दावे व अवमान याचिता विचारात घेवुन न्यायालयातील प्रलंबित अपीलाचे अधिन राहुन नियुक्ती देणे आवश्यक वाटते त्यामुळे मा.स्थायी समितीकडे उत्रचित निर्णयासाठी सादर.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की,. श्री.म्हसे यांचे नियुक्तीचे मुळ कागदपत्र तसेच न्यायालयाचे आदेशाची प्रमाणीत नक्कलसह फेरसादर करा.

यावर आस्थापना प्रमुख श्री.व्ही.एस.थोरात यांचा फेरसादर रिपोर्ट की, श्री.म्हसे यांचे नेमणुकीचे मुळ प्रकरण यासोबत जोडले आहे. मा.न्यायालयाचे निर्णयाची प्रमाणित नक्कल मिळणे साठी कामगार विभागाकडे मा.न्यायालयात अर्ज दाखल केलेला असून अद्यापपर्यत नक्कल प्राप्त झालेली नाही. तथापि श्री.म्हसे यांनी मा.औद्योगिक न्यायालय येथून निर्णयाची सत्यप्रत सादर केली असून ती यासोबत जोडली आहे. तरी आदेशार्थ सादर.

यावर उत्रायुक्त (सा)यांचा अभिप्राय की, अहवालानुसार फेरसादर

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, मनपा विधिज्ञाचे कायदेशिर मत घेउत्र्न फेरसादर करा.

यावर आस्थापना प्रमुख श्री.व्ही.एस.थोरात यांचा फेरसादर रिपोर्ट की, ॲड.एस.के.पाटील यांनी अभिप्राय

दिला की, मा.उच्च न्यायालय, यांनी अपील दाखल करून घेतांना स्थगिती आदेश दिलेला नसल्यामुळे श्री.म्हसे यांनी नोकरीत कायम करावे याबाबत कंटेम्प्ट केस दाखल केली आहे. म.न.पा.ने श्री.दरवडे व श्री.इथापे यांना कामांचे आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात काम नेमुन दिलेले आहे. उद्यान अधिक्षक हे पद रिक्त असेल व महानगरपालिकेस आवश्यकता असल्यास आर्थिक परिस्थिती पाहुन श्री. म्हसे यांना तात्पुरत्या स्वरूपात काम देणे बाबत आपले स्तरावर निर्णय घेणे उचित होईल असे मत दिलेले आहे. तरी आदेशार्थ सादर असे.

यावर उपायुक्त (सा)यांचा अभिप्राय की, कलम ५३ व ५४ चा विचार करता त्यांना रिक्त पदी कायम नेमणुक देता येईल काय ? याबाबत विधितज्ञांना विचारणा करावी. याबाबत श्री.दरवडे यांचे प्रकरण शासन पत्रव्यवहार व म.न.पा.ठरावासह विधीतज्ञांना दाखवावे.

यावर आस्थापना प्रमुख श्री.व्ही.एस.थोरात यांचा फेरसादर रिपोर्ट की, ॲड.एस.के.पाटील यांनी अभिप्राय दिला की, म.न.पा.ने श्री.दरवडे यांना सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने रिक्त पदावर सामावून घेतलेले आहे. श्री.म्हसे यांचे उद्यान अधिक्षक हे पद रिक्त असल्यास व म.न.पा.स आवश्यकता असल्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवुन नोकरीत सामावुन घेणे योग्य होईल असे मत दिलेले आहे. तरी आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा)यांचा अभिप्राय की, अहवालानुसार व विधीज्ञांचे मतानुसार कारवाईसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, उद्यान अधिक्षक हे पद रिक्त आहे काय ?

यावर आस्थापना प्रमुख श्री.व्ही.एस.थोरात यांचा फेरसादर रिपोर्ट की, उद्यान अधिक्षक हे पद सध्या रिक्त आहे.आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा)यांचा अभिप्राय की, अहवालानुसार आदेशार्थ फेरसादर.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, प्रस्तावाशी सहमत.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा. उपायुक्त (सा),मा.आयुक्त सो.यांचे अभिप्रायासह व आस्थापना प्रमुख श्री.व्ही.एस.थोरात यांचे फेरसादर रिपोर्टासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा : मा.श्री.दीप चव्हाण यांनी प्रस्तावास मंजुरी दिली व त्यास मा.श्री.कैलास गिरवले यांनी अनुमोदन दिले.

ठराव : ऑफिस रिपोर्ट पाहता श्री.उध्दव गोविंद म्हसे, यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) नुसार गार्डन सुपरिटेंडेंट या पदावर नेमणुक देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. ठराव सर्वानुमते मंजुर. सुचक : मा.श्री.सुरेश शेळके, अनुमोदक : मा.श्री.मनेष साठे,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १०                                    दिनांक : ८-११-२००५.

---

प्रस्तावाचा विषय : सिव्हील ड्राप्समन या पदावर नेमणुक मिळणें बाबत श्री.सुरेश कोंडीबा इथापे यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : श्री एस के इथापे,यांनी दिनांक ७/४/०५ रोजी अर्ज देवून ते सन १९९२ पासून कनिष्ठ अभियंता या पदावर तात्पुरत्या सेवेत असून मा.औद्योगिक न्यायालयाने केस नंबर (यु.एल.पी) १५६/९४ मध्ये दिनांक १८/२/९९ रोजी निकाल देवून त्या दिवसापासून कनिष्ठ अभियंता या पदावर कायम करण्याचे आदेश दिले. त्याबाबत तत्कालीन नगरपालिकेने मा.उच्च्च न्यायालयातअपील दाखल केले.परंतू सिव्हील अर्ज नंबर ३२२७/०३ च्या अर्जामध्ये मा.उच्च्च न्यायालयाने औद्योगिक न्यायालयाचे निर्णयास स्थगीती नाही.तरी निकालाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. त्याबाबत वेळोवेळी विनंत्या करुनही नेमणूक दिलेली नाही.कनिष्ठ अभियंता या पदावर सामावून घेणेसाठी मनपाने प्रस्ताव शासनाकडे सादर केला. त्यास मान्यतेसाठी वेळ लागण्याची शक्यता आहे.त्यामुळे सध्या मनपात रिक्त असलेल्या सिव्हील ड्राप्समन या पदावर मा.न्यायालयाचे अंतिम निर्णयास अधिन राहून व १८/२/९९ च्या कनिष्ठ अभियंता या पदावर कायम होण्याच्या जागेवर हक्क ठेवून प्राधान्याने सामावून घेण्याची विनंती केलेली आहे.

श्री इथापे यांनी मा.औद्योगिक न्यायालयात केस नंबर (यु.एल.पी) १५६/४ दाखल करुन सन १९९२ पासून हंगामी सेवेत असल्याने कायम स्वरुपी नेमणूक मिळणेची मागणी केली. सदर केसचा निर्णय मा.न्यायालयाने दिनांक १८/२/९९ रोजी देवून श्री इथापे यांना १८/२/९९ पासून नोकरीत कायम करणेचे आदेश दिले.

सदरबाबत शासनाचे मत मागविण्यात आले असता मा.न्यायालयाचे निर्णयाविरुध्द उच्च्च न्यायालयात रिट दाखल करावा असे कळविल्याने श्री इथापे सह इतर ४० बाबत उच्च्च न्यायालयाचा औरंगाबाद खंडपीठात न.पा तर्फे रिट पिटीशन नंबर ३३३३/९९ दाखल करण्यात आले. सदरचा रिट मा.न्यायालयाने दाखल करुन घेतला परंतू मा.औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयास स्थगीती देण्यात आली नाही.सदरचा रिट पिटीशन आजही प्रलंबीत आहे.

दरम्यान श्री इथापे व इतर यांनी मा.औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही.म्हणून फौजदारी केस नंबर २००१ दाखल केलेली आहे.तसेच श्री इथापे व श्री दरवडे यांनी उच्च्च न्यायालयात सिव्हील अर्ज नंबर ३२२७ / २००३ दाखल करुन मा.उच्च्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नसल्याने दिनांक १८/२/९९ च्या मा.औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी.अशी मागणी केली. सदर अर्ज दिनांक २८/११/०३ रोजी सुनावणीस आला असता मा.उच्च्च न्यायालयाने निर्णय दिला की, स्थगिती नसल्याने मा.औद्योगिक न्यायालयाने दिनांक १८/२/९९ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणेसाठी त्या प्राधिकरणासमोर प्रयत्न करावा. परंतू पद रिक्त नसल्याने मा.न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे शक्य झालेले नाही.

दरम्यान तत्कालीन नगरपरिषदेने तसेच मनपाने ठराव करुन मा.औद्योगिक न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे कायम झालेल्या कर्मचा-यांना कायम करण्यासाठी मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर केलेला आहे.परंतू अदयाप त्यास मान्यता मिळालेली नाही.

मा.स्थायी समिती ठराव नंबर १७ दिनांक १५/६/२००४ अन्वये आस्थापना सुचीवर कनिष्ठ अभियंता पद ९ मंजूर करणेस तसेच श्री इथापे यांना प्राधान्याने नेमणूक देण्यास विचार करावा. असा ठराव पारीत झालेला आहे.त्याचप्रमाणे मनपा सभा ठराव नंबर ६ दिनांक २०/७/२००४ अन्वये मा.स्थायी समितीची शिफारस मंजूर करण्यात आलेली असून श्री .इथापे यांना त्वरीत नेमणूक देण्यात मान्यता देण्यात आलेली आहे.सदर ठरावाप्रमाणे श्री.इथापे यांना प्रथम ६ महिन्यासाठी व परत ३ महिन्यासाठी दरमहा रुपये

५०००/- मानधनावर नेमणूक करण्यात आलेली आहे.

श्री.इथापे यांनी सिव्हील ड्राप्समन या पदाबाबत केलेल्या अर्जाचा विचार करता सदर पद भरणेसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून अर्जि मागविण्यात आले होते. त्यासाठी १०२ अर्ज प्राप्त झालेले असून त्यामध्ये श्री.एस के इथापे यांच्याही अर्जाचा समावेश आहे.त्यांना मनपा सेवेचा १३ वर्षाचा अनुभव आहे.व त्यांनी अर्जासोबत केलेल्या सेवेचा विचार करुन वय शिथील करुन ड्राप्समन या पदावर नेमणूक मिळण्याची विनंती केली आहे.सदर पदाची वेतनश्रेणी ५५००-९००० अशी आहे.जाहिरातीमध्ये सदरचे पद खुल्या प्रवगार्साठी आहे.त्याची पात्रता डिप्लोमा ( सिव्हील ) पास व अनुभव अशी आहे.

मनपा मधील वैधानिक पदे वगळता इतर पदाच्या भरतीसाठी कलम ५४ अन्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे.सदर समितीपुढे ड्राप्समन या पदाचे भरतीबाबत चर्चा झालेली असता श्री.इथापे यांनी केलेल्या कंटेम्प केसेस उत्र्पोषणाच्या नोटीसा व मा.शासनाकडे वेळोवेळी केलेल्या मागण्या याचा विचार करुन सदरचे पद भरतीसाठी दिलेली जाहिरात व प्रक्रिया रद्य करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री.गोरक्षनाथ दत्तात्रय दरवडे यांना रिक्त असलेल्या लॅब टेक्नीशियन या पदावर नेमणूक देणेसाठी मा.नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठविला असता त्यांचे पत्र क्रमांक ए.एच.सी १००३ /२२८३/ प्र.क्र.२९४/०३ ने २४ दिनांक १९/४/०४ अन्वये मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ अन्वये उत्र्चीत कार्यवाही करावी.असे कळविले आहे.

मुंबई प्रातिंक मनपा अधिनियम १९४ चे कलम ५३ अन्वये नेमणूकीबाबत तरतूद आहे.५३ (१) अन्वये ज्याचे वेतन भत्ते वगळून रुपये ४००/- किंवा त्यापेक्षा जास्त आहे असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांनी नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये विहीत असेल,

कलम ५४ अन्वये नेमणूक करण्याची रित निश्चित केलेली असून त्याची तरतूद अशी आहे.

पोटकलम (१) आयुक्त किंवा त्याने पदनिर्देशित कोणत्याही अन्य अधिकारी ,नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक संबंधीत विभाग प्रमुख व आयुक्ताने नामनिर्देशित केलेला फक्त एक अन्य अधिकारी याची एक निवड समिती असेल,

(२) आधिच न.पा.सेवेत असेलेल्या व्यक्तीमधून नेमणूक करावयाचे योजीले असेल त्या व्यतिरिक्त किंवा नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून ६ महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी नसेल तर कर्मचारी निवड समितीने नियमाद्धारे विहीत केलेल्या रितीने कलम ५३ पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ठ केलेल्या नेमणूकी व्यतिरिक्त व महानगरपालिका शासनाच्या पुर्वमंजूरीचे आदेशाद्धारे या सोबत विनिर्दीष्ठ करील अशा नेमणूकी व्यतिरिक्त नपा सेवेतील अन्य सर्व उत्र्मेदवारासाठी निवड केली पाहीजे.याशिवाय पोटकलम ३ व ५ मध्येही तरतूदी आहेत.

वरील प्रमाणे तरतूदी पहाता श्री.एस.के.इथापे हे सन १९९२ पासून हंगामी स्वरुपात नोकरीत होते.तदनंतर आजही ते मनपा मध्ये तात्पुरत्या स्वरुपात सेवेत आहेत.त्यांचे कामही समाधानकारक आहे.तरी त्यांचे अर्जाप्रमाणे त्यांना मंजूर असलेल्या सिव्हील ड्राप्समन या पदावर वेतनश्रेणी ५५००-९००० या मध्ये नेमणूक देण्यास तसेच भविष्यात कनिष्ठ अभियंता हे पद उत्र्पलब्ध झाल्यास त्यावर आग्रक्रमाने विचार करणेबाबत.

सदरची नेमणूक कलम ५३(१) अन्वये मनपा सभेच्या मान्यतेने करता येईल.मा.औद्योगिक न्यायालयाचा अवमान होवू नये यास्तव नेमणूक करणे योग्य होईल तरी आदेशार्थ .

यावर मा.उपायुक्त (सामान्य ) यांचा अभिप्राय की, दिनांक १३/७/२००५ च्या निवड समितीच्या बैठकीत निर्णय होवून ड्राप्समन या रिक्त पदासाठी यापुर्वी सुरु करण्यात आलेली निवड प्रक्रिया रद्य करणेत आलेली आहे.त्यामुळे अ प्रमाणे कार्यवाहीसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सहमत.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा.) व मा.आयुक्त साो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मा.श्री.कानडे : विषयास विरोध नाही. रिक्त पदाची भरती निवड समितीद्वारे केली जाते. श्री.इथापे यांचा अर्ज होता. परंतु सदर पदाची जाहिरात रद्द केली. त्याच वेळी श्री.इथापे यांची नेमणुक का केली नाही ? महासभेची मंजुरीची आवश्यकता आहे काय ?
उपायुक्त : महासभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

**--*--**

ठराव : ऑफिस रिपोर्ट पाहता श्री.सुरेश कोंडिबा इथापे, यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) नुसार सिव्हील ड्रॉप्समन या पदावर नेमणुक देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.ठराव सर्वानुमते मंजुर. सुचक : मा.श्री.मनेष साठे, अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ११ दिनांक : ८-११-२००५.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणां मार्फत राबविणे कामी मा.शासनाचे पत्रा प्रमाणे लोक -वर्गणीची रक्कम भरणे बाबततसेच कर्जाची रक्कम उत्र्भारणीस्तव मान्यता देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : उत्र्परोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, तत्कालीन नगरपरिषद असतांना दिनांक १-७-१९९९ पासून केडगांवचा समावेश झालेला आहे. तेंव्हापासुन तत्कालीन नगरपरिषद व सध्या महानगरपालिके मार्फत केडगांव प्रभागास पाणी पुरवठा करण्यांत येतो. मा.श्री.भानुदास एकनाथ कोतकर, नगरसेवक तथा शहराध्यक्ष आय कॉग्रेस यांनी दिनांक २१-५-२००४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचेकडेस निवेदन देवुन केडगांव साठी कायमस्वरुपी पाणी पुरवठा होणेसाठी वसंतटेकडी येथील उत्र्दभव गृहीत धरुन केडगांव येथील बालाजी संपवेल पर्यंत ३५० एम.एम.व्यासाची पाईपलाईन टाकण्याची मागणी केली होती. त्यानुसार सन २०२१ ची अंदाजीत लोकसंख्या ५४३०० इतकी गृहीत धरुन व केडगांवला दररोज पाणी पुरवठा उत्र्पलब्ध होणेच्या दृष्टीने पुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळामार्फत शासनास सादर करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकास व आराखडयास मा.महाराष्ट्र शासनाने केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजना राबविणेकामी मा.शासन निर्णय क्रं.पापुयो/१९०३/स.क्रं./ २९१/प्र.क्रं.३५/२००३/पा.पु.१७ दिनांक ११-८-२००३ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. व सदर योजनेची मंजुर किंमत रु ४,३३,३८,३४८/- इतकी असुन योजनेचा वित्तीय आकृतीबंध खालील प्रमाणे देण्यांत आलेला होता.

| | | |
|---|---|---|
| अ. | शासकीय अनुदान २३.३३ %रु | १,०१,१०,८३७/- |
| ब. | कर्ज ६६.६७ % रु | २,८८,९३,६७६/- |
| क. | लोकवर्गणी १० % रु | ४३,३३,८३५/- |
| | एकुण रु. | ४,३३,३८,३४८/- |

सदर योजनेसाठी म.जि.प्रा.मंडळाकडे १० % लोकवर्गणीची रक्कम रुपये ४३,३३,८३५/- इतकी भरणे म.न.पा.स अनुज्ञेय होती. पैकी रु.५ लाख म.जि.प्रा.मंडळास लोकवर्गणी पोटी भरलेली आहे. परंतु त्यानंतर अधिक्षक अभियंता, म.जि.प्रा.मंडळ, अहमदनगर यांनी त्यांचे पत्र क्रमांक ताशा/१७३६ दिनांक २८-४-०४ चे पत्रान्वये सदर योजनेतील डी.आय.के.७ पाईपच्या बाजार भावात मोठया प्रमाणात वाढ झाल्याने व मागविलेल्या निविदा जास्त दराने आल्याने योजनेच्या मुळ किंमतीत वाढ झाली त्यामुळे योजनेची सुधारित किंमत रुपये ५,१३,९९,८३५/- (ढोबळ) एवढी असुन मंजूर योजनेपेक्षा हा खर्च रु.८०,६१,४८७/- एवढा जास्त होतो. सदरच्या जास्तीच्या खर्चामुळे योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी म.न.पा.चे सुधारित ठराव पारित करुन म.जि.प्रा.स सादर करावा तसेच सुधारित आकृतीबंधानुसार येणारे कर्ज व १०% लोकवर्गणी बाबतीतही कार्यवाही करावी असे पत्राने कळविले होते.

म.जि.प्रा.मंडळाचे पत्रानुसार सदर पाणीपुरवठा योजनेच्या जास्तीच्या खर्चामुळे योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव दिनांक ३-८-२००४ चे सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांत आला होता. व त्याप्रमाणे योजनेचा सुधारित आकृतीबंध खालील प्रमाणे होता.

| | | |
|---|---|---|
| अ. | शासकीय अनुदान २३.३३ %रु | १,१९,९१,५८१/- |
| ब. | कर्ज ६६.६७ % रु | ३,४२,६८,२७०/- |
| क. | लोकवर्गणी १० % रु | ५१,३९,९८४/- |
| | एकुण रु. | ५,१३,९९,८३५/- |

वरील प्रस्तावावर सांगोपांग चर्चा होवुन खालील प्रमाणे ठरास पारित झालेला होता.
मा.महानगरपालिका ठराव क्रमांक ११ दिनांक ३-८-०४
ठराव : मा.अधिक्षक अभियंता, म.जि.प्रा.मंडळ यांचेकडील पत्रान्वये केडगांव पाणी पुरवठा योजनेच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यांत येत असुन महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता सदर कामासाठी लागणारा निधी मा.शासनाने द्यावा. व सदर निधीच्या मागणीचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर.

वरील प्रमाणे पारित झालेल्या ठरावानुसार सविस्तर प्रस्ताव तयार करुन मा.शासनास सादर करण्यांत आला होता.

तसेच केडगांव पाणी पुरवठा योजनेबाबत मा.मंत्री महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६-४-२००५ रोजी मंत्रालयातील समिती कक्षात बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत झालेल्या चर्चेचे सविस्तर इतिवृत्त मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन पा.पु. व स्वच्छता विभाग यांचे कडुन संदर्भीय पत्रानुसार दिनांक ४-६-२००५ रोजी इकडेस प्राप्त झालेले आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्तानुसार शासनाचे दिनांक ११-८-२००३ च्या शासन निर्णयान्वये केडगांव प्रभागाकरीता रु.४३३.३९ लक्ष किंमतीची योजना मंजूर केली आहे. सदर योजनेतील रु.४३.०० लक्ष लोकवगर्णी पैकी अ.नगर मनपा ने केवळ ५.०० लक्ष इतकी रक्कम भरली आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेकडे रु. ३२ कोटी इतकी म.जि.प्रा. ची शिल्लक आहे. बैठकीत असे ठरले की, अहमदनगर महानगरपालिकेने लोकवर्गणीची रक्कम प्रथम भरावी त्यासाठी महानगरपालिकेने उत्त्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करावे. त्याचाच एक भाग म्हणुन इतर महानगरपालिकांना ज्या प्रमाणे जकात लागु करण्यांस परवानगी दिली आहे. तशी ती अहमदनगर महानगरपालिकेस लागु केल्यानंतर वाढणारे उत्त्पन्न पाणी पुरवठा योजनेच्या लोकवर्गणी पोटी जमा करावे. असे सुचविण्यांत आले.

लोकवर्गणीची रक्कम आणि रुपये २.८९ कोटी कर्ज रुपाने उत्पलब्ध होण्याची खात्री झाल्यानंतर शासकीय अनुदान योजनेच्या कामाच्या प्रगतीनुसार उत्पलब्ध करुन दिले जाईल असे स्पष्ट करण्यांत आले.

क्षेत्रीय अधिका-यांनी असेही निदर्शनांस आणुन दिले की, या योजनेमध्ये मोठया प्रमाणावर डी.आय.पाईपचा वापर करावयाचा आहे. मध्यंतरीच्या काळात डी.आय.पाईपच्या किंमतीत प्रचंड वाढ झालेली असल्याने या योजनेचे सुधारित अंदाजपत्रक तयार करावे लागेल. आताच्या ढोबळ अंदाजानुसार या योजनेची किंमत सुमारे रू.६.०४ कोटी होईल . त्यानुसार रू.०.६० कोटी लोकवर्गणी व रू. ४.०३ कोटी कर्ज उभारणी महानगरपालिकेस करावी लागेल. त्या लोकवर्गणी व कर्ज उभारणीची तयारी महानगरपालिकेने करावी असे मा.मंत्री महोदयांनी सुचित केले.

तरी केडगांव पाणीपुरवठा योजने बाबत दिनांक २६-४-२००५ रोजी मंत्रालयात मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील चर्चाचे सविस्तर इतिवृत्त मा.कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन पत्र क्र.पापुयो - १९०५ / प्र.क्र.-५३ / पा.पु.-१७ दिनांक ७-५-२००५ (प्राप्त दि.४-६-०५ ) चे पत्रानुसार पुढील निर्णय होणोकामी आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार प्रस्ताव मा.महासभेसमोर ठेवणेसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, महानगरपालिकेने १० % लोकवर्गणी भरणेबाबत ठराव करणे आवश्यक आहे. तसेच शासन अनुदाना व्यतिरिक्त सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम अंदाजे रू.४.०३ कोटी चे कर्ज महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत उत्भारणे बाबत ठराव करून केडगांव पाणीपुरवठा योजना राबविणे बाबत संमती कळविणेंस हरकत नाही.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा.) व मा.आयुक्त सो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा : ऑफिस रिपोर्ट वाचण्यात आला.

१) मा.श्री.दिपक सुळ - शासनाकडे याबाबत पूर्वी प्रस्ताव पाठविला होता. त्याचे काय झाले? व हा विषय पुन्हा बोर्डात येण्याचे कारण काय?

यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, पूर्वी ठराव करण्यात आलेला होता व शासनाकडे पाठविण्यात आलेला होता. परंतु अशाप्रकारे योजना मंजूर होणार नाही त्यामुळे सदरचा प्रस्ताव पुनश्च सर्व साधारण सभेपुढे ठेवलेला आहे. शासनाकडून अनुज्ञेय अनुदान फक्त मिळू शकेल.

२) मा.श्री.दीप चव्हाण - पूर्वी ५ लाख रुपये भरलेले आहेत.

३) मा.श्री.शेख मुदस्सर - यांनी चर्चेत मुददा उत्पस्थित केला की, मुकुंदनगर फकिरवाडा येथील पाण्याचा विषय जनरल बोर्डापुढे का घेतला नाही? यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, अवर्षण प्रवर्षणमध्ये सदरची योजना घेतलेली होती. अनुदानाचा निधी मिळालेला नाही. सदरची योजना नियमित योजना करुन महानगरपालिकेने करावी, असे म्हंटले आहे व असा प्रस्ताव दिला आहे. तो सर्वसाधारण सभेपुढे घ्यावा लागेल. यावर मा.महापौरयांनी सांगितले की, माझ्याकडे विषय आल्यानंतर तो सर्वसाधारण सभेपुढे घेउत्र

--*--

ठराव : मा.शासनाकडे १० % लोक वर्गणी भरावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करणेंत यावी. ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक : मा.श्री.दिपक सुळ.अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १२ दिनांक : ८-११-२००५.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : सावेडी स.नं.२१३ / २, २०६ / १ ब / १ अ, २०६ / १ ब / २ / १ मधील खुली जागा वनस्पती उद्यान व आरोग्य प्रकल्प विकसित करणेंसाठी मिळणें बाबत डॉ.राजा ठाकुर , आयुर्वेद व्यासपीठ,शाखा नगर यांचा दिनांक १५-२-०५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अर्जदार डॉ.राजा ठाकूर , आयुर्वेद व्यासपिठ शाखा - नगर यांनी दिनांक १५/२/२००५ रोजी इकडेस अर्ज सादर करुन सावेडी स.नं २१३/२, २०६/१ ब / १ अ + २०६ /१ ब /२/१ (जुना स.नं १८१,१८६ ) मधील खुली जागा वनस्पती उद्यान व आरोग्य प्रकल्प विकसीत करणेसाठी मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

सावेडी स.नं २१३/२, २०६/१ ब / १ अ + २०६ /१ ब /२/१ (जुना स.नं १८१,१८६ ) या जमिनीच्या रेखांकनास चिफ ऑफीसर ठराव क्रमांक ४५७ दिनांक २/१२/१९९१ अन्वये मंजूरी देण्यात आली असून सदर मंजूर रेखांकनामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेली२९५२.३७ चौ.मि क्षेत्राची खुली जागा रेखांकन धारकांनी महानगरपालिकेच्या नावे करुन दिली असल्याचे ७/१२ उत्त्रा-यानुसार आढळते. प्रस्तूत खुल्या जागेची वनस्पती उद्याने व आरोग्य प्रकल्प यासाठी अर्जदार संस्थेने मागणी केलेली आहे.

मंजूर अभिन्यासातील खुल्या जागेच्या क्षेत्रापैकी १०% क्षेत्र सार्वजनिक संस्थाना विकासासाठी देणेबाबत शासनाने क्र.टिपीबी / ४३९६/११४/ प्र.क्र.८९/९६ / नवि -११ दिनांक १० जुन १९९६ अन्वये खुली जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली असल्यास महानगरपालिका सदर जागा अभिन्यासातील भुखंड धारकांच्या सहकारी गृह निर्माण संस्थेस फेडरेशन ऑफ सोसायटीज यांना निदेशामधील अटी शर्ती विचारात घेवून करारावर देउ्र शकेल किंवा स्वत: विकसीत करु शकेल अशाबाबत निदेश दिलेले आहेत.

तसेच महानगरपालिका ठराव क्रमांक १३ दिनांक २०/२/२००४ अन्वये यापुढे महानगरपालिकेच्या खुल्या जागा स्वतः महानगरपालिकेने विकसीत करावयात अथवा अभिन्यासामधील प्लॉट धारक यांच्या हौसिंग सोसायटयांना विकसित करण्यासाठी देण्यात याव्या.इतरांना देण्यात येवू नये अशा बाबतचा ठरावा पारीत करण्यात आलेला आहे.

असे असले तरी ही उत्र्परोक्त शासन निदेश अभिन्यासातील खुल्या जागेपैकी १०% क्षेत्रावर करावयाच्र्या बांधकामाबाबतचे आहत.प्रस्तूत प्रकरणी ही खुली जागा वनषौधी व इतर वृक्षांची लागवड करुन खुली जागा या वापरासाठीच विकसित करुन इच्छित आहेत.त्यावर सदरहू संस्था कोणते ही बांधकाम

करणार नाही असे त्यांच्या अर्जावरुन दिसते सबब खुल्या जागेचा विकास करण्यासाठी भुखंड धारकांच्या संमतीनेच आलेला हा प्रस्ताव खालील अटीस अधीन राहून स्विकारणे योग्य होईल असे मत आहे.

१.प्रस्तूत प्रकल्प अहमदनगर महानगरपालिका व संबधीत संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविणे आवश्यक राहील.

२.खुल्या जागेचा वापर फक्त खुल्या वापरासाठी करण्यात यावा. या जागेवर कोणतेही बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

३.प्रथमतः ही जागा ३ वर्षासाठी कराराने देण्यात यावी.प्रकल्पाची प्रगती व इतर गोष्टी तपासून पुढील निर्णय घ्यावा.

४.सदर रेखांकनातील भुखंड धारकांना या खुल्या जागेचा मुक्त वापर करता येईल.

५.उत्परोक्त प्रकल्पातून भविष्यांत काही महसूली उत्त्पन्न जमा झाल्यास त्यावर निम्मा हक्क मनपाचा राहील.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, उत्परोक्त अटींच्या अधीन राहून सदर भुखंडाचा वनस्पती उद्यान व आरोग्य प्रकल्प विकसीत करण्यास परवानगी देणेसाठी विषय मान्यतेकरीता मा.महासभेपुढे ठेवणे योग्य

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत धन्वंतरी उद्यानाचे विकासास मान्यता देणेस हरकत नाही.सदरचे उद्यान विकास करतांना नगारीकांसाठी इको जॉगींग ट्रॅक आणि योग्य लॅण्ड स्केप नुसार विकास करणे संबंधीतावर बंधनकारक करणेची गरज आहे.१०% खुल्या जागेत संबंधीताकडून नकाशे - आराखडे घेवून योग- प्राणायम तसेच निसर्ग उत्पचार केंद्रास आवश्यक क्षेत्रास बांधकाम करणेस परवानगी देणेस मान्यता देणेस हरकत नाही.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व मा.आयुक्त सो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

१) मा.श्री.दिप चव्हाण - सर्व साधारण सभेने ठराव क्र.१३ दि.२०-२-२००४ चा ठराव कोणालाही जागा न देण्याबाबत मंजूर झालेला आहे. असे असताना जागा देउ नये. सदरचा ठराव रद्द झालेला आहे काय, याचा खुलासा करावा. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, जागा दयावयाची नसून फक्त झाडे लावण्याकरीता जागा उत्पलब्ध करुन दयावयाची आहे. त्यावर नगररचनाकार यांनी हा विषय वेगळा असल्याचा खुलासा केला. परंतु मा.श्री.चव्हाण यांनी सांगितले की, हीच जागा देणेबाबतचा अटटाहास का आहे?

२) मा.श्री.मिलींद गंधे - धर्माधिकारी मळा येथील जागा वनस्पती उत्र्दयान व आरोग्य प्रकल्पाला देणेबाबत आजूबाजूचे प्लॉटधारक रहिवासी यांनी १००/-रु.च्या बॉण्डवर लेखी संमती दिली आहे. सदर संस्था ही धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी झालेली संस्था आहे. व चांगली संस्था आहे. त्यामुळे त्यांना जागा मंजूर करावी, असे सुचविले. त्यावर मा.श्री.चव्हाण यांनी मागील ठराव क्र.१३ / २०-२-२००४ रदद करणेबाबत सांगितले. मा.श्री.सुळ यांनी सांगितले की, ठराव रदद करण्याची आवश्यकता नाही. मा.श्री.अनंत जोशी यांनी सांगितले की सदरचा प्रकल्प चांगला असल्याने या ठरावास विरोध करु नये.

मा.श्री.सुळ यांनी सुचविले की, सदर संस्था व महानगरपालिका यांच्या संयुक्त विदयमाने झाडे लावणार आहे व त्याठिकाणी विकास होणार आहे.

मा.श्री.अशोक कानडे यांनी पूर्वीचा ठराव रदद करणेबाबत सुचविले.

त्यावर मा.श्री.दीप चव्हाण, मा.श्री.मिलींद गंधे व मा.श्री.कानडे यांचे भाषण चालु असताना सभागृहात गोंधळ.

३) मा.श्री.कृ.द.जाधव - यापूर्वी ठराव क्र.१३ मंजूर केलेला आहे. तत्पुर्वी ब-याच संस्थांना जागा दिलेल्या आहेत. परंतु जागेचा दुरुपयोग होतो. असे दिसते. १) आसाराम बापू आश्रमाकरीता २) स्वामी समर्थ केंद्र यांना जागा दिलेल्या असताना पूर्ण बांधकामे झालेली आहेत.

आयुर्वेद कॉलेज संस्थेने यापूर्वी वनस्पती उत्र्दयान विकसीत केलेले आहे. पिंपळगांव येथील किंवा सिना नदीलगतचे जागेचा उत्र्पयोग करावा.

४) मा.श्री.अनंत जोशी - चांगला प्रोजेक्ट उत्र्भा राहत असेल तर जागा देण्यास हरकत नाही. व सुरुवातीला ३ वर्षे कराराने दयावी.

नगररचनाकार श्री.धोंगडे यांनी खुलासा केला की, जागा फक्त वनस्पती उत्र्दयान व आरोग्य प्रकल्पासाठी दयावयाची आहे. अशा प्रकारे जागा मंजूर करता येईल, असे सुचविले.

५) मा.श्री.कैलास गिरवले - वारुळाचा मारुती येथील जागा दयावी. त्यानंतर सांगितले की, शुभ मंगल कार्यालय येथे ६००० चौ.फुटाची जागा होती. पण आता फक्त ५०० चौ.फुट जागा राहीलेली आहे व तेथे अतिक्रमण झालेले आहे.

मा.महापौर यांनी सुचविले की, जागा देण्याबाबत अटी व शर्ती टाकाव्यात. तथापी जेथे अतिक्रमण झालेले असतील तेथे कार्यवाही करावी.

मा.श्री.जाधव यांनी सुचविले की, जागा देताना १०% बांधकामाबाबत परवानगी दिलेली असताना ब-याच ठिकाणी जागा बांधकाम झालेले आहेत. त्याबाबत माहिती देण्यात यावी.

अतिक्रमणाबाबत मा.श्री.गिरवले यांनी उत्र्पस्थित केलेल्या मुददयबाबत मा.श्री.लहाने, उपायुक्त यांनी खुलासा केला. मा.आयुक्त यांनी सांगितले की, बांधकाम अनुज्ञेय नसेल तेथे बांधकाम पाडणेबाबत कार्यवाही केली जाईल व अशा ठिकाणच्या जागा विक्री केल्या असल्यास फौजदारी कारवाई करावी.

मा.महापौर यांनी सांगितले, जागा देताना अटी व शर्ती घालून जागा देण्यात यावी व येणा-या तक्रारींची दखल घ्यावी. तसेच ज्या ज्या ठिकाणी दिलेल्या जागेत अतिक्रमणे झालेली असतील त्याचा सर्व्हे करुन माहिती दयावी. ओपनस्पेसला कंम्पाउंन्ड करणेबाबत कार्यवाही करावी.

६) मा.श्री.दीप चव्हाण - जागा चांगल्या ठिकाणी दयाव्यात. तसेच सर्व साधारण सभेपुढे विषय घेताना परिपूर्ण विषय घ्यावा.

--*--

ठराव : साधक बाधक चर्चा होवुन ठरविण्यांत येते की, मा.सर्व साधारण सभा ठराव क्र.१३ दिनांक २०-२-२००४ अन्वये जागा न देण्यांचे धोरणांबाबत पारित केलेला ठराव प्रथमत : रद्य करणेंत येत असुन सावेडी स.नं.२१३ / २, २०६/ १ ब, १ अ २०६ / १ ब /२ / १ मधील खुली जागा ऑफिस रिपोर्ट नुसार ३ वर्षे कराराने हस्तांतरण करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करणेंत यावी.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.अनंत जोशी. अनुमोदक : मा.श्री.दिपक सुळ.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :१३ दिनांक : ८-११-२००५.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण ) अध्यादेश २००१ नुसार गुंठेवारी प्रकरणे सादर करणेंस मुदतवाढ देणे बाबत मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता यांची दि.२६-७-२००५ ची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : संदर्भित यादीन्वये मा.वाकळे बहिरनाथ तुकाराम,विरोधी पक्षनेता यांनी गुंठेवारी प्रकरणे योग्य त्या कागदपत्रासह महानगरपालिकेस सादर करण्यांची मुदत वाढवून मागितलेली आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहे.

१. विषयांकित गुंठेवारी अध्यादेशातील कलम ४ (१) अन्वये गुंठेवारी विकास नियमाधिन करणेसाठी अर्ज सादर करणेंची मुदत वाढवुन देण्यांचे अधिकार मा.महासभेस आहेत. उत्प्ररोक्त अधिनियम अंमलात आल्यापासुन ६ महिन्याच्या मुळ मुदतीनंतर मा.महासभेने ही मुदत वारंवार वाढवून दिलेली आहे. शेवटची मुदतवाढ दि.३१-३-२००५ पर्यंत होती. या मुदतीत एकुण २१७० अर्ज प्राप्त झालेले आहेत. पुर्वीच्या सर्वेक्षणावरून सर्वसाधारणपणे ३००० अनधिकृत गुंठेवारी विकास झालेल्या मालमत्ता आढळून आलेल्या आहेत. म्हणजेच अद्यापपावेतो अजुनही अनेक मालमत्ताधारकांना उत्प्ररोक्त अधिनियमांचा लाभ घेण्यांसाठी अर्ज सादर करता आलेले नाहीत. त्यामुळे यादीत नमुद केल्यानुसार अशी मुदतवाढ दिल्यास संबंधितांना अर्ज दाखल करण्यांची आणखी एक संधी मिळू शकेल. ही वस्तुस्थिती विचारात घेता गुंठेवारी प्रकरणे दाखल करण्यांची मुदत वाढवुन देणे योग्य ठरेल. ही मुदत दि.३१-१२-२००५ पर्यंत वाढवुन देणे योग्य होईल.

२. दाखल झालेली गुंठेवारी प्रकरणांची छाननी सुरू असुन ही प्रकरणे शक्य तितक्या लवकर निर्गत करण्यांत येत आहेत. तथापि काही अर्जदार अर्ज केल्यानंतर योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यांस किंवा पुढील कार्यवाही करण्यांस अनुत्सुक दिसतात. अर्ज सादर केला म्हणजे आपला गुंठेवारी विकास नियमाधिन झाला असेही समजातात. अशाप्रकारामुळे प्रशासनास पुढील कार्यवाही करणे अडचणीचे होईल. संबंधितांना याकामी पुढील कार्यवाही करणेंसाठी उद्युक्त करणेसाठी कालमर्यादा आखून देणे आवश्यक आहे. सबब याबाबत धोरण ठरविण्यांसाठी संबंधितांच्या एकुण दंडनिय रकमेमध्ये प्रतिवर्षी १ % वाढ करणे योग्य होईल असे वाटते. तसेच याकामी पुर्णपणे दुर्लक्ष करणां-या नागरिकांवर कठोर कार्यवाही करण्यांत येईल. असे सुचित करणे योग्य होईल.

३. गुंठेवारी विकास प्रकरणांची छाननी करतांना प्रकरणांत मोजणी नकाशा नसणे व जागेच्या निश्चित हद्यी ठरविणे ही बाब जिकरीची ठरते. अशा अडचणींमुळे अनेक गुंठेवारी प्रकरणे प्रलंबित आहेत. वास्तविक मोजणी नकाशा देणे ही संबंधित नागरिकांची जबाबदारी आहे. तथापि विविध अडचणीमुळे त्यांना हा मोजणी नकाशा देणे शक्य होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यावर मार्ग काढण्यांसाठी नगर रचना

विभागास मानधन तत्वावर निवृत्त मोजणीदार मिळाल्यास हे काम सुकर होईल. या मोजणीदाराचा इतरही तांत्रिक कामांसाठी उत्र्पयोग्य करून घेता येईल.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती अहवाल माहितीसाठी सादर. मान्य झाल्यास उत्र्परोक्त प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणे योग्य होईल.

यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव १, २, ३ प्रमाणे निर्णयासाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.आयुक्त साो.यांचा अभिप्राय की, प्रस्तावाशी सहमत.

अशा बाबतची मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर ) व मा.आयुक्त साो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्व साधारण ठेविला.

--*--

चर्चा.

१) मा.श्री.नामदेव पवार - गुंठेवारीमध्ये चर्चा करताना सांगितले कि, मुदत देउत्र्न विषय मंजूर करावा. तसेच शिवाजीनगर, कल्याणरोड उत्र्पनगरामध्ये शेतात घरे बांधलेली आहेत. त्यांना सध्या ठेवलेली फी रु.७०००/- जाचक आहे. इतर महानगरपालिकेमध्ये २०००-३००० अशी फी आहे. तरी फी कमी करण्यात यावी. सदर ठिकाणच्या रहिवाशांना पाणी कनेक्शन व इतर सोयी सवलतींकरीता तोंड दयावे लागते.

२) मा.श्री.दिपक सुळ - यापूर्वी २ वेळा मुदत वाढ दिलेली आहे. मागील बोर्डात ५००० ने फी कमी केली आहे. काही नागरिकांनी ३०००० भरलेले आहेत. त्यांना रिफंड देण्यात यावा. तसे शक्य नसल्यास घरपटटीत समायोजन करण्यास प्राधान्य देण्यात यावे. तफावतीची रक्कम परतावा करणेबाबत कार्यवाही करावी व ही प्रकरणे लवकर मार्गी लावावीत.

३) मा.श्री.दीप चव्हाण - यापूर्वी ज्यांनी अर्ज केले आहेत त्याला ५-६ वर्षे झालेली आहेत. त्यांनी आतापर्यंत ३ ते ५ हजारापर्यंत फी भरुन ठराव मान्य केले आहेत. सध्याच्या प्रस्तावाप्रमाणे मुदतवाढ देणे योग्य आहे पण अदयाप ज्यांनी अर्ज दिलेले नाहीत त्याबाबत काय कार्यवाही करणार? यावर नगररचनाकार श्री.धोंगडे यांनी खुलासा केला की, जोपर्यंत मोजणी होत नाही तोपर्यंत निर्णय होत नाही. त्यावर मा.श्री.चव्हाण यांनी सुचविले की, मुदतवाढ अशा रितीने दयावी की, तांत्रिक प्रश्न सुटु शकेल. गुंठेवारीमध्ये असेच नागरीक अर्ज करतात की ज्यांच्याकडे कागदपत्रे नाहीत.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, स्टाफ अपुरा असल्यामुळे काही अडचणी येत असतील व त्यास वेळ लागणारच याकरीता जबाबदार अधिकारी नेमून त्यांचेकडे प्रकरणे मार्गी लावण्यासाठी देण्यात यावीत. मा.आयुक्त यांनी सांगितले की याकडे वैयक्तिक न पाहता सामुदायीक प्रकरणे पाहण्यात यावीत. मा.श्री.चव्हाण यांनी चांगल्या सेवानिवृत्त अधिकारी नेमणेबाबत सांगितले. मा.श्री.पवार यांनी सांगितले की, काही लोक पैसे भरण्यास तयार आहेत. तरी दर कमी करावेत.

४) मा.श्री.बहिरनाथ वाकळे - अधिकारी जागेवर सापडत नाहीत. नागरिकांना माहिती मिळत नाही. खास पथक तयार करुन त्यांना ही कामे देण्यात यावीत असे सुचविले.

५) मा.श्री.गिरवले - बरेचसे नागरिक प्लॉटची विक्री करतात. सिटी सर्व्हेलाही नोंदी करतात. परंतु महानगरपालिकेत नोंदी केल्या जात नाहीत. त्यामुळे ब-याच नोंदी होत नाहीत. त्यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, प्लॉटवर परस्पर घरे बांधताना त्यावर असलेला टॅक्स संबंधीतांना भरावा लागतो.

६) मा.श्री.संदिप कोतकर - शेतकरी वर्ग शेतामध्ये घरे बांधतात. या शेतामध्ये घरामध्ये जाणे अडचणीचे असते. रस्ते नाही, पाणी नाही. अशा नागरिकांनी काय करावे. त्यांना सवलत मिळावी.

मा.आयुक्त यांनी याबाबत खुलासा केला की, सदरची बाब ही गुंठेवारीमध्ये येउ्त शकत नाही.

७) मा.महापौर - बाकीच्या महानगरपालिकांमधील याची माहिती घ्यावी. व जादा पैसे लोकांनी भरले असल्यास ते परत करण्याची व्यवस्था करावी व अधिका-याची जबाबदारी फिक्स करावी. व ६ महिन्याच्या आत कार्यवाही पूर्ण करावी. यावर मा.आयुक्त साहेब यांनी सांगितले की, याबाबत मोहीम घेउ्न कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

--*--

ठराव : साधक बाधक चर्चा होवुन ठरविणेत येते की, महानगरपालिकेचे यापुर्वी गुंठेवारी विकास नियमाधिन करणे , श्रेणीवाढ व नियंत्रण अध्यादेशानुसार सदरची कार्यवाही करणेंस यापुर्वी दिलेली मुदत वाढ विचारात घेवून ठरावाचे तारखेपासुन आणखी ६ महिने मुदत वाढ ही सभा देत आहे. प्रथम महानगरपालिका ठरावाचे यापुर्वी ज्यांनी गुंठेवारी प्रकरणे निपयमीत करतांना जादा रक्कमा भरलेल्या असतील त्यांचे अर्जानुसार तफावतीची रक्कम नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने परतावा करावी. मात्र तत्पुर्वी त्यांचेकडुन महानगरपालिकेची रक्कम घेणे असेल तर त्याचे वसुलीस प्राधान्य देण्यांत यावे. खात्री नंतरच परतावा प्रक्रिया करणेंत यावी. मात्र सदरची प्रकरणे नियमित करणेसाठी एकुण प्रकरणे त्यातुन निकाली निघालेली संख्या नगण्य असल्याचे दिसते.याकरीता या कामी माहितगार अशा कर्मचा-याची मानद नेमणुक करणेंस देखील मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.दिपक सुळ.

अनुमोदक : मा.श्री.बहिरनाथ वाकळे.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १४ दिनांक : ८-११-२००५.

-----------------------------------------------------------------

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध आरोग्य केंद्रामध्ये होमिओपॅथिक बाहयरुग्ण विभागासाठी जागा मिळणें बाबत मा.प्राचार्य अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल,सावेडी रोड,अहमदनगर यांचा दिनांक २३-८-२००५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : उत्र्परोक्त संदर्भीय विषयानुसार विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, अहमदनगर होमिओपॅथीक संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल, सावेडी रोड, अहमदनगर, यांनी त्यांच्या महाविद्यालयाच्या संलग्नित रुग्णालयाच्या होमि. ओ.पी.डी.साठी महानगरपालिकेकडुन जागा उत्र्पलब्ध करुन देणेविषयी अर्ज केला आहे.

महानगरपलिकेच्या एकाही दवाखान्यात होमिओपॅथिक उत्र्पचाराची सोय नाही. आणि ज सेवाही उत्र्पलब्ध नाही. खाजगी दवाखान्यात होमि. उत्र्पचार अत्यंत महागडे व सर्व सामान्य जनतेला न परवडणारे आहे. होमि. उत्र्पचार करवुन घेणारे अनेक रुग्ण नगर शहरात असुन त्यांचा या उत्र्पचारावर पूर्ण विश्वास आहे. सदरहु संस्थेला होमि.ओ.पी.डी.साठी जागा उत्र्पलब्ध करुन दिल्यास महानगरपालिकेच्या रुग्ण सेवेत एका वैशिष्टयपुर्ण कार्याची भर पडेल.

नुकतेच महानगरपालिकेने सर्व प्रशासकीय पूर्तता करुन वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे भरली ५ रिक्त पदांपैकी ४ पदांवर वैद्यकीय अधिकारी कामावर हजर झालेले आहेत.

सध्या झेंडीगेट, दाणेडबरा व म.फुले दवाखाना येथे अजुनही उत्र्पलब्ध वैद्यकीय अधिका-यांना सकाळच्या सत्रात एका दवाखान्यात व दुपारच्या सत्रात दुस-या दवाखान्यात काम पहावे लागते. या व्यतिरिक्त त्यांना आरोग्य शिबिर, पल्स पोलिओ, शालेय मुलांची आरोग्य तपासणी, लसिकरण, कुष्ठरोग नियंत्रण, क्षयरोग नियंत्रण इत्यादी कामे सोपविलेली आहेत.

महानगरपालिकेच्या महात्मा फुले दवाखान्यात सदरहू संस्थेस होमि.ओ.पी.डी. सुरु करणेसाठी जागा उत्र्पलब्ध करुन दिल्यास रुग्णांची तपासणी मोफत करणार आहेत. आठ दिवसाच्या औषधाकरीता नाममात्र ५/- रु आकारणार आहेत. रुग्ण आठवडयात ज्या दिवशी येतील त्यावेळी आठवडयाच्या औषधाचे शुल्क आकारण्यांत येईल ही संस्था त्यांच्याकडील वैद्यकीय अधिका-यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करणार आहेत. महानगरपालिकेने महात्मा फुले दवाखाना या संस्थेस उत्र्पलब्ध करुन दिल्यास गरीब व गरजू रुग्णांना त्याचा लाभ घेणे शक्य होईल.

वरील सर्व परिस्थिती पाहता अहमदनगर होमिओपॅथिक कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल या संस्थेच्या अर्जानुसार त्यांच्या प्राचार्यांकडुन खालील अटी व शर्ती मान्य करुन घेणे योग्य वाटते.

१. प्राचार्याकडुन पात्र व अनुभवी डॉक्टरांच्या सेवा महानगरपालिका बाहय रुग्ण सेवेसाठी त्या दवाखान्याच्या ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे देणे आवश्यक राहील.
२. कुठल्याही परिस्थितीत आरोग्य सेवा खंडीत होता कामा नये.
३. रुग्णांना दिल्या जाणा-या वैद्यकीय सेवेसंबंधी व दिल्या जाणा-या औषध गोळयांच्या प्रतिकुल परिणामांची सर्व जबाबदारीसंबंधित वैद्यकीय अधिका-यांची राहील.
४. दवाखान्यात लागणा-या औषध-गोळयांचा पुरवठा महानगरपालिका करणार नाही.
५. सदर सेवा रद्द करावयाची झाल्यास १ महिना आगावु सूचना देण्यांत यावी.

६. वैद्यकीय सेवेसाठी काही अडचणी उत्र्द्भवल्यास प्रथम मुख्य वैद्यकीय अधिकारी नंतर आरोग्याधिकारी यांचेकडुन योग्य ते मार्गदर्शन घेउत्र्नच वरिष्ठांशी संपर्क साधणे बंधनकारक राहील.

तरी सदरहु संस्थेस तूर्त ६ महिन्यांच्या मुदतीसाठी प्रायोगिक तत्वावर म.फुले दवाखाना, माळीवाडा येथे होमिओपॅथिक ओ.पी.डी. चालू करण्यांस परवानगी देणे उत्र्चित वाटते.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मंजुरीकरीता मा.महासभेपुढे शिफारशीसह ठेवणे योग्य. मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो, यांचा अभिप्राय की, महानगरपालिकेच्या दवाखान्यातून चांगल्या प्रकारचे औषधोपचार आणि होमिओपॅथि च्या माध्यमातून प्रस्तावित ठिकाणी १ (एक) वर्षाचे कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर दवाखाना चालविणेस देणेस हरकत नाही.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व मा.आयुक्त सो, यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेविला.

--*--

<u>चर्चा.</u>

१) मा.श्री.दीप चव्हाण - दवाखाना सुरु करण्यास हरकत नाही.

२) मा.डॉ.सौ.योगिता सत्रे - याबाबत आम्ही वेळोवेळी पत्राद्वारे मागणी केली आहे. होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज यांचे अध्यक्षांनी वेळोवेळी मागणी केलेली आहे. तेव्हा प्रायोगिक तत्वावर जागा देण्यास हरकत नाही. त्याचप्रमाणे बुरुडगांवरोड येथील दवाखान्याकरीता जागा दयावी असे सुचविले.

--**--

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर.तदनुषंगिक खर्च मंजुर. तळ मजल्यावरील इमारतीचा भाग व यापुर्वीची मनपा मार्फतची सेवा पहिल्या मजल्यावर पुर्वी प्रमाणेच नागरिकांसाठी ठेवणेंत यावी. प्रायोगिक तत्वावर ११ महिनेचा करार करणेत यावा. ठराव सर्वानुमते मंजुर. सुचक : मा.सौ.योगिता र.सत्रे. अनुमोदक : मा.श्री.दिप चव्हाण.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १५ दिनांक : ८-११-२००५.

---

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर शहरातील आयात होणां-या भाजीपाला व दुधावरील जकात माफ करणे बाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता व श्री.राठोड राजेंद्र रामनारायण ,शिवसेना गटनेते यांची दिनांक २०-१०-२००५ रोजीची यादी .

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता व श्री.राठोड राजेंद्र रामनारायण ,शिवसेना गटनेते यांनी दिनांक ९-५-०५ रोजी यादी देवुन त्यात असे नमुद केले की,दिनांक २७ ऑगस्ट २००५ पासून अहमदनगर महानगरपालिकेने शहरामध्ये जकात कराची अंमलबजावणी सुरू केलेली आहे. जकात कर नियमातील तरतुदीनुसार शहर हद्दीत येणां-या दुध व भाजीपाला यावर जकात कर लावण्यांत आलेला आहे.

महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर व्यतिरिक्त अन्य कोणत्याही महानगरपालिकेमध्ये दुधावर जकात कर लागु करण्यांत आलेला नाही. त्याचप्रमाणे भाजीपाला यावरही ब-याच ठिकाणी जकात कर माफ करण्यांत आलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिका जकात नियम २००५ मधील नियम क्र.४ (अ)(२) मधील तरतुदीनुसार जीवनावश्यक वस्तु कि ज्या दारिद्रय रेषेखालील कुटूंबे व नागरिक यांना आवश्यक आहेत,अशा वस्तुवर माफी देण्यांची तरतुद आहे.

अहमदनगर शहरात दुध व भाजीपाला यावर जकात लागु झाल्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये नाराजी असुन हा कर माफ करण्यांसाठी मा.नामदार श्री.बाळासाहेब थोरात, कृषी पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री,महाराष्ट्र राज्य तसेच मा.नामदार बबनरावजी पाचपुते , मंत्री वन विभाग यांनी शासनाकडे पत्र दिलेले आहे.

महानगरपालिकेस वरीलप्रमाणे जकात माफीचा अधिकार असल्यामुळे तशा प्रकारचा ठराव पारित केल्यास शासन त्यास मंजुरी देवू शकते. तसेच नियमातील तरतुदीनुसार पारगमन पासाच्या मुल्यामध्ये वाढ करणेचे महासभेस अधिकार आहे. दोन्ही बाबींची सांगड घालून तशा प्रकारचा जकात अभिकर्ता यांचेशी पुरवणी करार करून तरतुदीची अंमलबजावणी करणेबाबतचा प्रस्ताव अहमदनगर महानगरपालिका महासभेपुढे सादर करावा हि विनंती.

अशाबाबतची मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता व श्री.राठोड राजेंद्र रामनारायण ,शिवसेना गटनेते यांची यादी पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविली.

--*--

चर्चा.

१) मा.श्री.दीप चव्हाण - याबाबतचा ऑफिस रिपोर्ट वाचावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचण्यात आला.

२) मा.श्री.अशोक कानडे - ऑफिसचे काय म्हणणे आहे याचा खुलासा करावा. यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, आलेली यादी महासभेपुढे ठेवली आहे, ऑफिसची टिपणी नाही. यावर मा.सर्वश्री नगरसेवक कानडे, बोरा, वाकळे, जोशी यांनी विचारले की, ऑफिसचे काय म्हणणे आहे.

३) मा.श्री.किशोर बोरा - मागील बोर्डामध्ये दरावर चर्चा नको म्हंटल्यानंतर आता या दरावर चर्चा करता येईल काय?

४) मा.श्री.अनंत जोशी - प्रशासनाची भुमिका काय? कारखानदारी बाबत चुकीचा विषय केला गेला आहे. प्रशासनाची यामध्ये चुक आहे. उदयोगाबाबतही जिव्हाळयाचा विषय आहे. याबाबत आम्ही भारतीय जनता पार्टीचे वतीने यादी दिली होती. परंतु यादी डावलण्यात आली आहे. सदर विषयाला ऑफिस रिपोर्ट का नाही? यावर मा.महापौर यांनी सांगितले की, नागरिकांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. यावर मा.श्री.जोशी यांनी सांगितले, संपूर्ण महाराष्ट्रात दुध, भाजीपाल्यावर जकात नाही.

५) मा.श्री.अशोक कानडे - याबाबत प्रशासनाने आपली भुमिका स्पष्ट करावी.

मा.उपायुक्त श्री.देशमुख यांनी खुलासा की, जकात नियम करताना नियमामध्ये स्पष्ट तरतूद केलेली आहे. त्यामधील नियम नं.४ मध्ये शासनाचे आदेश लागु होतील.

दुध व भाजीपाल्यावर सन ८३ सालापासून जकात होती. सन १९९३ मध्ये ठराव करुन माफ केलेली आहे. दुध व भाजीपाल्यावर जकात लावता येत नाही असे नाही. याबाबत शासनाला रिपोर्ट दिलेला आहे. जिवनावश्यक बाबींवर जकात माफी देता येईल अशा एकूण १० बाबी आहेत. त्यामध्ये दुध व भाजीपाल्याचा समावेश आहे. महासभा त्याबाबत निर्णय घेउ शकते.

६) मा.श्री.किशोर बोरा - अन्न,वस्त्र,निवारा अशा ९ वस्तुंचा यादीमध्ये समावेश करावा.

७) मा.श्री.जोशी - पेट्रोल, डिझेल, गॅस यासुध्दा जिवनावश्यक वस्तु आहेत.

८) मा.श्री.किशोर बोरा - साखर, तेल, तुप यावरसुध्दा जकात माफ होउ शकते.

९) मा.श्री.भानुदास कोतकर - महत्वाचा विषय मागे ठेवलेला दिसतो. दुध व भाजीपाला जकात माफीबाबत शेतक-यांचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. हा विषय अगोदर चर्चेला घेतला असता तर बरे झाले असते. दुध व भाजीपाल्यावर जकात लावली हे चुक झाले. तेव्हा जकात कशा रितीने माफ करता येईल ते पहावे. जकातीमुळे शहरातील नागरिकांवर दरडोई १६०० रु.चा बोजा पडलेला आहे. दुध, भाजीपाला, फळे जिवनावश्यक वस्तु आहेत. राज्यामध्ये दुधावर कोठेही जकात नाही. तरी जिवनावश्यक वस्तुवरील जकात माफी देणेबाबत व याबाबत पर्याय शोधणेबाबत विनंती केली. याबाबत सभागृहाला ठरविणेचे अधिकार आहेत. त्याचप्रमाणे नागापुर एल / एम ब्लॉकमध्ये बरेच उद्योगधंदे आहेत. त्यांनाही जकात सवलत देता येईल किंवा कसे ते पहावे.

दुध व भाजीपाला यावर किती जकात होते व किती माफी आपण करु शकतो याबाबत विचार करावा.

१०) मा.श्री.सुरेश शेळके - दुध व भाजीपाला वरील जकात माफीचे प्रस्तावाची यादी आम्ही दिलेली आहे. महानगरपालिका जकात नियम २००५ मधील कलम ४ मध्ये जकात माफीची तरतूद आहे. त्याप्रमाणे दुध व भाजीपाल्यावर जकात माफ करावी व याची भरपाई एस्कॉर्ट दर वाढवून करावी. आज इतर महापालिकांमध्ये पाहिले असता औरंगाबाद - ५०, ठाणे - ७०, कल्याण - १०० असे दर आहेत. याबाबत जकात अभिकर्ता यांचेशी चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा व तुट भरुन काढणेसाठी एस्कॉर्ट वाढवावा.

११) मा.श्री.त्रिपाठी - अनेक जिवनावश्यक बाबी आहेत. जकात माफीतून फक्त ३३ लाख रु. तुट येणार आहे. ठेकेदार सध्या ४० ते ५० रु.एस्कॉर्ट घेत आहेत. ३३ लाख रु.चे तुटीकरीता कोणताही एस्कॉर्ट दर वाढवू नये असे सांगितले. त्यास मा.श्री.किशोर बोरा यांनी अनुमोदन दिले.

१२) मा.श्री.अनंत जोशी - महिन्याभरामध्ये भाजीपाल्यावर जकात वसुल केलेली नाही.

१३) मा.श्री.भानुदास कोतकर - अजेंडयावर शेवटी विषय घेतला.अगोदर विषय घेतला असता तर बरे झाले असते. मनपाने दुध व भाजीपाला यावर जकात लावली ही चुक झाली.जकात कशा पध्दतीने माफ करता येईल.ते पहावे शेतक-यांचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे.दुध व भाजीपाला ही जीवनावश्यक बाब आहे.राज्यात कुठेही दुधावर जकात नाही. जीवनावश्यक वस्तूवर जकात माफ कशी करता येईल ते पहावे पर्याय शोधावा जकातीमुळे नगर शहरातील जनतेवर दरडोई रुपये १६०० चा बोजा पडलेला आहे. सभागृहाला माफ करणेचे अधिकार आहेत.

त्याचप्रमाणे एम आय डी सी कडील एल / ॲन्ड एम ब्लॉकमध्ये जकात माफी देण्याबाबत वेगळा विचार करु शकतो. दुधावर व भाजीपाला वार्षीक किती जकात माफ करु शकतो याचा विचार करावा. पर्याय शोधणे शक्य आहे. तरी जकात माफी दयावी, ही विनंती.

१४) मा.श्री.सुरेश शेळके - महानगरपालिका जकात अधिनियम २००५ कलम ४ ॲक्ट अन्वये जकात माफीची तरतूद आहे.दुध व भाजीपाला यावर जकात माफ करण्याबाबत विषय घेण्यासाठी यादी दिलेली आहे. जकात माफ करण्यासाठी जकात अभिकर्ता चर्चा करावी महाराष्ट्रामध्ये इतर महानगरपालिकामध्ये एस्कॉर्ट दर औरंगाबादला ५० रुपये तर ठाण्याला ७० रुपये आहे.तेव्हा तुट भरुन काढण्यासाठी एस्कॉर्ट दर वाढवून दयावेत.ही विनंती. असे सांगीतले.

१५) मा.श्री.त्रिपाठी - नगर शहरातील ५० टक्के व्यापार बाहेर गेला आहे.त्यामुळे ठेकेदारास मदत करण्यासाठी हा विषय घेतला गेला आहे.यात षडयंत्र आहे. सदस्य मानधनाची भरपाई करावी. अनेक जीवनावश्यक बाबी आहेत त्यातून फक्त ३३ लाख उत्त्पन्न कमी होणार आहे. ठेकेदार सध्या ४० ते ५० रुपये एस्कॉर्ट घेत आहे. फक्त ३३ लाख रुपयासाठी एस्कॉर्ट दर वाढवून देवू नये.

यास श्री किशोर बोरा यांनी अनुमोदन दिले.

१६) मा.श्री.अनंत जोशी - महिन्याभरात दुध व भाजीपाला यावर किती जकात वसुल केली माहिती दयावी. बजेटमध्ये धरलेली रुपये ३३ लाख माफ करावेत मात्र एस्कॉर्ट दर वाढवू नये.

१७) मा.श्री.अशोक कानडे - जीवनावश्यक वस्तूवरील जकात रद्य झालीच पाहिजे - नियमानुसार आपण एस्कॉर्ट दर वाढवू शकतो काय ?

यावर मा.उपायुक्त साहेब यांनी खुलासा केला की, नियम १४ (१) नुसार ठेकेदाराशी रिॲग्रीमेंट करावे लागेल.

१८) मा.श्री.सुळ - कराराचा भंग होणार नाही काय ? कोण ठरवणार

यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, नियमात तरतूद आहे. ठेकेदाराने मान्य केल्यास त्यास शासनाचे मान्यतेनंतर कार्यवाही होवू शकते.

१९) मा.श्री.मिलींद गंधे - दुध व भाजीपाला यावर जकात कमी केल्यास भरपाई म्हणून जकात अभिकर्ता यांना एस्कॉर्ट मध्ये रुपये ५/- वाढ करुन दयावी.

२०) मा.श्री.अशोक कानडे - प्रस्तावात इतर विषयाचा उल्लेख का केलेला नाही. रॉकेल व अन्न धान्य का घेतले नाही. अन्न ,वस्त्र, निवारा यावर जकात माफ करावी. कपडयावर जकात माफ करावी.

यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, अन्न धान्य जकात शासन भरते. रॉकेल शासन पुरविते प्रश्न उपस्थित होवू शकत नाही.

२१) मा.श्री.अशोक कानडे - दुध व भाजीपाला यावर जकात माफ केल्यानंतर ठेकेदार यास अडचण निर्माण होईल त्यावर प्रशासनाने काय निर्णय घेतला आहे.

यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, बैठकीत निर्णय घ्यावा लागेल.

२२) मा.श्री.अशोक कानडे - ३३ कोटी पेक्षा जास्त ठेका गेला आहे तरी १० ॲटम माफीसाठी घ्यावे. पारगमन मध्ये वाढ करु नये. तुट ४१ कोटी मधून वजा करावी.

एल / एम ब्लॉकबाबत चर्चा उपस्थित झाली. त्याबाबत सभागृहात गोंधळ निर्माण झाला. त्यावेळी श्री.कानडे, श्री.जोशी, श्री.गंधे, श्री.दिप चव्हाण, श्री.नामदेव पवार व श्री.कृष्णा जाधव हे उभ्रे राहून बोलत होते.- गोंधळ

२३) मा.श्री.गंधे - दुध व भाजीपाला जकात माफी देण्याबाबत एकमत झालेले आहे.यावर जकात माफी दिल्यास पारगमन तसेच जॉब वर्क करणारे लोकांचे मालावर सुट दिल्यास पाच रुपये वाढवून देण्यांत यावे.भाजपा सदस्यांनी सांगीतले जकात माफी आवळा देवून कोहळा काढू नये.

सभागृहात गोंधळ, श्री.कृष्णा जाधव बोलत होते.जकात माफ व्हावयास पाहिजे.खादी ग्रामोदयोग वस्तूवरील त्याचप्रमाणे तेलावरील जकात माफ व्हावयास पाहीजे.जीवनावश्यक १० वस्तूवरील लिस्ट काढावी.व त्यावर जकात माफ करावी.काही लोक जकात विषयाचे वेळी सभेमध्ये मुददाम गैरहजर राहिले होते वैयक्तीक बोलत नाही.जीवनावश्यक वस्तूचा विचार करावा ठेका दिला आहे केस कोर्टात आहे - पेपरमधील बातम्या खोटया आहेत काय दोनच वस्तू जकात माफी करतांना आणखी आठ वस्तू वर जकात माफ करावी.चार जणांची कमेटी नेमावी.विचार करावा,त्या दहा वस्तू ठरवा व एस्कॉर्ट मध्ये वाढ दया पाच पेक्षा जादा वाढवा.५० रुपये एस्कॉर्ट करा - चार जणांची कमेटी नेमा येथे एमडीएल कायदा चालतो असे सांगीतले.

२४) मा.श्री.दिप चव्हाण - आमचा सुरुवातीस विरोध आहेच जकात एक वर्ष चालविल्यानंतर ठेका दयावा, असे म्हणणे होते. आणी आमचे म्हणणे लोकांना पटत आहे. दर / कर चर्चा नाही. म्हणून दुधावर जकात लागली आहे. दारिद्रय रेषेनुसार १८०० कुंटुबे आहेत. नियमावली तयार करतांना याचा विचार केला गेला नाही. नविन प्रस्तावास मान्यता नाही. सरसकट एक टक्का जकात कर लावणे जरुरी होते. जकात कर लावणेबाबतचा अजूनही कोर्टाचा निर्णय व्हायचा आहे. दर कर पाहिले नाहीत, शासनानेही पाहिले नाहीत. सरसकट एक टक्का दर लावावा. जो काही कोर्ट निर्णय होईल तो मान्य राहील.

२५) मा.श्री.गिरवले - झालेली चुक दुरुस्त करण्यास जमलो आहोत. शेतकरी वर्ग गरीब आहे. त्यांच्या मालाला योग्य मोबदला मिळाला नाही तर तो उपाशी राहील. कापड, पेट्रोल हे काही शेतक-याचे उत्त्पादन नाही. त्यावर जकात लावावयासच पाहिजे. आजपर्यंत अनेक शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. परंतु कधी उदयोजकाने आत्महत्या केल्याचे ऐकले आहे काय? किंवा कधी रोजगार हमीवर गेल्याचे आढळून आले नाही. शेतकरी आहे तर देश आहे. देशाचा आर्थिक कणा शेतकरीच आहे. शेतक-याच्या उत्त्पादनावर जकात माफी करावी.

२६) मा.श्री.उत्तडाणशिवे - मुळ सभेत कॉंग्रेस राष्ट्रवादीने दुध, भाजी, अंडी यावर जकात माफीचा प्रश्न मांडला होता. तसेच गाढव, डुकरे प्राण्यांवरही जकात माफीचा प्रश्न मांडला होता.

२७) मा.श्री.सुरेश शेळके - दुध, भाजीपाल्यावर जकात माफ करावी. एस्कॉर्ट रु.४० करावा. व १० चाकी वाहनांसाठी एस्कॉर्ट रु.६० करावा.

मा.महापौर यांनी सांगितले की, अहमदनगर शहर हे सर्वांचे आहे. वैयक्तिक हेवेदावे याचा विचार न करता सर्वांच्या हिताचा विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या आर्थिक हितासंबंधाचाही विचार करणे आवश्यक आहे. दुध व भाजीपालायावरील जकात माफ करताना एस्कॉर्ट दर रु.४० करण्यात यावा. व १० चाकी वाहनांच्यापुढे रु.६० दर घेण्यात यावा, असे सुचविले.

मात्र सदर प्रस्तावास मा.सर्वश्री नगरसेवक बहिरनाथ वाकळे, अनंत जोशी, अशोक कानडे, अविनाश घुले, किशोरकुमार बोरा व सुनिल त्रिपाठी यांचा विरोध असल्याचे त्यांनी सांगितले.

ठराव : महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका हद्यीत कुठेही दुध व भाजीपाल्यावर जकात नाही. त्याप्रमाणे सभागृहात सर्वच सदस्यांनी या विषयावर झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार सर्वानुमते दुध व भाजीपाल्यावर जकात माफ करण्यांत यावी. तसेच इतर जीवनावश्यक वस्तु धान्य (ज्वारी, बाजरी व गहु ) जनावरांचा चारा, अंबाडी या वस्तुंवरही जकात माफ करण्यांत येत आहे.

वरील मालापासुन येणांरी जकातीची तुट भरून काढणेसाठी पारगमन पास फी रू.२० ऐवजी रू.४० /- करण्यांत यावी. तसेच १० चाकी व त्यापुढील मोठया वाहनावर प्रतिवाहनास रूपये ६० /- पारगमन फी आकारणी करणेंस मंजुरी देण्यांत येत आहे. सदर बाबत जकात अभिकर्ता यांचेशी मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांनी योग्य तो करारनामा करावा व अंमलबजावणी करावी. नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही त्वरीत करण्यांत यावी. मात्र एस्कॉर्ट फी मध्ये वाढ करण्यांस खालील सदस्यांनी विरोध केला.

१. मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम
२. मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत
३. मा.श्री.कानडे अशोक नाथा
४. मा.श्री.घुले अविनाश हरिभाउ
५. मा.श्री.बोरा किशोरकुमार हिम्मतलाल
६. मा.श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण

बहुमताने ठराव मंजुर
सुचक : मा.श्री.सुरेश शेळके.
अनुमोदक : मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : १६. दि. ८-११-२००५.

प्रस्तावाचा विषय - मा.सभासद यांचे रजेचे अर्ज.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : खालील मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविले.

| अ.नं. | मा.सदस्यांचे नांव | सभा रजेची तारीख |
|---|---|---|
| १ | मा.श्री.खांडरे ज्ञानेश्वर सदाशिव | ८-११-२००५. |
| २ | मा.सौ.काळे गितांजली सुनिल | ८-११-२००५. |
| ३ | मा.सौ.खरपुडे जयश्री सुरेश | ८-११-२००५. |
| ४ | मा.सौ.बिज्जा अर्चना संतोष | ८-११-२००५. |
| ५ | मा.श्री.चोपडा संजय फुलचंद | ८-११-२००५. |
| ६ | मा.श्री.घुले शंकरराव हरिभाऊ | ८-११-२००५. |

ठराव : रजेचे अर्ज मंजूर.
नोंद घेण्यांत येत आहे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दिनांक : २२-८-२००५.

---

प्रस्तावाचा विषय : मर्चन्ट बँक,अहमदनगर संचालक मंडळाच्या निवडणूकीत मतदान करण्यांचा अधिकार प्रदान करणे
बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : विनंती रिपोर्ट की, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,अहमदनगर मर्चन्ट को-ऑप.बँक,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.१८ दि.११-७-२००५ अन्वये सन २००५ ते २०१० या कालावधीसाठी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक मा.जिल्हा उत्पनिबंधक,सहकारी संस्था,अहमदनगर यांच्या कार्यालयाकडून घेण्यांत येणार आहे.

सदरच्या संचालक निवडणूकीसाठी आपल्या संस्थे तर्पे मतदान करण्यांचा अधिकार ज्या व्यक्तीस द्यावयाचा आहे त्याची संपुर्ण माहिती सोबत जोडलेल्या फॉर्म मध्ये भरुन दिनांक २१-७-२००५ पावेतो बँकेच्या मुख्य कार्यालयात पाठविणे बाबत कळविलेले आहे.

तरी मर्चन्ट बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी मतदान करणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेचे मतदान करण्यांचा अधिकार कोणास द्यावयाचा या बाबत आदेशार्थ सादर.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

१. भिस्तबाग स.नं.२/१अ /२/२,२/४अ आणि २/४ ब
२. भिस्तबाग स.नं.२/१अ२ २ब२/ ४ अ आणि २/४ब
३. भिस्तबाग स.नं.२/१अ/२ २/२अ /४अ आणि २/४ब१, २/४ ब२

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :७ दिनांक : ८-११-२००५.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या सिध्दीबाग व्यायाम शाळेस नांव देणें बाबत मा.नगरसेवक श्री.संदिप कोतकर व श्री.नामदेव पवार व इतर पाच मा.नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या सिध्दीबाग व्यायामशाळेस कै.दत्तु खलिफा व्यायामशाळा नांव देणे बाबत मा.नगरसेवक यांनी दिनांक १८-५-२००५ चे पत्रानुसार कळविले आहे. सिध्दीबाग व्यायामशाभ ही सिध्दीबाग व्यायामशाळा म्हणुनच संबोधली जाते. या व्यतिरिक्त सदर व्यायामशाळेस कोणाचेही नांव देण्यांत आलेले नाही.

महानगरपालिकेच्या इमारतींना नांव देण्यांचे अधिकार मा.महासभेचे असल्यांने सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

अशाबाबतची मा.नगरसेवकांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविली.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मा.सर्वसाधारण सभेपुढील विषय.

१ मागील दिनांक १३-९-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे

२ दुखवटयाचे प्रस्ताव

३ प्रश्नोत्तरे -

१.मा.श्री.कृ.द.जाधव,नगरसेवक यांचे दि.६-४-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे.

२.मा.श्री.संजय चोपडा ,नगरसेवक यांचे दि.२५-५-०५ चे यादीतील प्रश्नांची उत्तरे.

३.मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम,विरोधी पक्ष नेता यांचे दि.२८-७-०५ चे यादीतील
प्रश्नांची उत्तरे.

४ धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व थोर सेनानी महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेबाबत मा.श्री.शिंदे अनिल माधवराव नगरसेवक यांची यादी.

५ भुषणनगर चौक ते डायमंड बेकरी ते दत्त चौक ,वैष्णवनगर या रस्त्यांस धर्मवीर संभाजी राजे यांचे नाव देणेबाबत.मा.सर्वश्री.कोतकर संदीप भानूदास ,नगरसेवक, लोंढे संजय पांडुरंग,नगरसेवक,कांबळे मंगला राजकुमार, नगरसेविका,राहिंज कमल बापु,नगरसेविका,कोतकर सुनिल रामदास, नगरसेवक, गव्हाळे विजय नाना, नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

६ बंगाल चौकी ते मार्केट यार्ड चौक पर्यंतच्या रस्त्यांला अमर शहीद थोर संत कंवरराम साहेब यांचे नाव देणेबाबत.मा.श्री.घुले अविनाश हरिभाऊ यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

७ गंज बाजारातील नवा मराठा ते मोहन ट्रंक डेपो पर्यंतच्या रस्त्यांस ''कै.धर्मवीर जगदिश भोसले मार्ग '' असे नाव देणेबाबत मा.श्री.मैड सतिष बबनराव नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

८ श्रीमत तृप्ती राकेश चव्हाण ,हिस अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबतचा ऑफीस रिपोर्ट.

९ श्री.उध्दव गोविंद म्हसे यांना गार्डन सुप.या रिक्त पदावर नेमणूक करणेबाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयास्तव.

१० सिव्हील ड्राप्समन या पदावर नेमणुक मिळणें बाबत श्री.सुरेश कोंडीबा इथापे यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

११ अहमदनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणां मार्फत राबविणे कामी मा.शासनाचे पत्रा प्रमाणे लोक -वर्गणीची रक्कम भरणे बाबततसेच कर्जाची रक्कम उभारणीस्तव मान्यता देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

१२ सावेडी स.नं.२१३ / २, २०६ / १ ब / १ अ, २०६ / १ ब / २ / १ मधील खुली जागा वनस्पती उद्यान व आरोग्य प्रकल्प विकसित करणेंसाठी मिळणें बाबत डॉ.राजा ठाकुर,आयुर्वेद व्यासपीठ,शाखा नगर यांचा दिनांक १५-२-०५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

१३ महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधिन करणे , श्रेणीवाढ व नियंत्रण ) अध्यादेश २००१नुसार गुंठेवारी प्रकरणे सादर करणेंस मुदतवाढ देणे बाबत मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता, यांची दि.२६-७-२००५ ची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

१४ अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध आरोग्य केंद्रामध्ये होमिओपॅथिक बाहयरुग्ण विभागासाठी जागा मिळणें बाबत मा.प्राचार्य अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल,सावेडी रोड,अहमदनगर यांचा दिनांक २३-८-२००५ चा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

१५ अहमदनगर शहरातील आयात होणां-या भाजीपाला व दुधावरील जकातीबाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता यांची दिनांक २०-१०-२००५ रोजीची यादी.

१६ मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

**<u>कृपया तारीख व वेळ मिळावी.</u>**

( एन.जी.चत्तर )
नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ ( अ ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : १९-१-२००६

श्री./ श्रीमती.......................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ३१-१-२००६ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १.विषय पत्रिका व टिपणी.
२.मागील सभेचे इतिवृत्त.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. ३१-१-२००६ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्व साधारण सभेपुढील विषय पत्रिका.

| | |
|---|---|
| १ | मागील दिनांक १४-१२-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| ३ | मा.राज्य शासनाचे सेवेत १ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणां-या कर्मचा-यासाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करणें बाबतचा दिनांक ३१ ऑक्टोंबर,२००५ चा शासन निर्णय व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | मुकूंदनगर,फकिरवाडा पाणीपुरवठा योजनांतर्गत ८ इंची पाईप लाईन व १० लाख लिटर्स क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | अहमदनगर शहरात रस्ते विकास महामंडळा मार्फत एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणें बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | नविपेठ शहर सहकारी बँकेजवळील चौकास " सदगुरु शंकर महाराज चौक " असे नामकरण करणें बाबत मा.श्री.अभय आगरकर,नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ७ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १९-१-२००६.
अहमदनगर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. ३१-१-२००६ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्वसाधारण सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | मागील दिनांक १४-१२-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे | नियमाप्रमाणे आहे.इतिवृत्त कायम करणेंस हरकत नाही. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव | टिप्पणी नाही. |
| ३ | मा.राज्य शासनाचे सेवेत १ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणां-या कर्मचा-यासाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करणें बाबतचा दिनांक ३१ ऑक्टोंबर,२००५ चा शासन निर्णय व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | |
| ४ | मुकूंदनगर,फकिरवाडा पाणीपुरवठा योजनांतर्गत ८ इंची पाईप लाईन व १० लाख लिटर्स क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | |
| ५ | अहमदनगर शहरात रस्ते विकास महामंडळा मार्फत एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणें बाबत ऑफिस रिपोर्ट. | |
| ६ | नविपेठ शहर सहकारी बँकेजवळील चौकास " सदगुरु शंकर महाराज चौक " असे नामकरण करणें बाबत मा.श्री.अभय आगरकर,नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | |
| ७ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही |

दिनांक :१९-१-२००६.
अहमदनगर

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.